ॐ

भाग ४

अर्घ्य

१	सहवास	- भैयाजी जोशी	१०३
२	पाणी किती आणणार	- राकेश सोनी	१०५
३	संजीवनी बुटी	- श्री. नरेंनसिंह मकोदरा	१११
४	स्मरण मात्रे	- दीपाली अविनाश काळे	११५
५	स्वामीजी	- लक्ष्मण गरोडिया	११८
६.	नमन स्वामींजी	- सौ. सुमंगला नं. सलगरकर	११९
७.	स्वामीजी का अपरिग्रह	- लक्ष्मण गडोदिया	१२०
८	हे यादव हे सखेंती	- अंजली सोनावणे	१२२
९	आश्रम अनुभूती	- रवींद्र जोशी	१२३
१०	तेथ अवचट पड़े पीयूख	- ज्ञानेश्वर राजकुंटवार	१२५
११	संस्काराचे परिणाम	- एक पथिक	१२६
१२	हमे प्रेम की नैय्या से भवसागर पार उतारो !!	-श्री कालुशंकरजी त्रिपाठी	१२९
१३	संस्काराचे परिणाम	- एक पत्र	१३०
१४	योगीया दुर्लभ तो म्या देखीला	- अनंत दामोदर दिवेकर	१३३
१५	छत्रछाया	- शनीकुमार राहुलभाई व्यास	१३५
१६	‘तपः श्रीमंत’ सवितानंद!	-	१४०
१७	नक्षत्रांचे देणे	- एक ज्योतिष अभ्यासक	१४३
१८	वाचक-साधकांच्या मनातील स्वामीजी	-	१४६
१९	श्रोत्रिय ब्रह्म निष्ठ संत से मिलन के अनुभव	- डॉ. डी.एस. काष्ट	१४९
२०	Biofield: Introduction, Methods and Spirituality	- Avishkar Katti	१५१
२१	Swami ji Aura	-	१५७

१. सहवास

सुरेश (भय्या जोशीजी)

पूर्व सहकार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक

जेष्ठ शु. ७/ युगाब्द ५१२३ १७/०६/२०२१

सादर नमस्कार,

सत्पुरुषांचे जीवन बघणे, त्यांचे मार्गदर्शन प्राप्त होणे व त्यांचे सान्निध्य लाभणे भाग्यात असावे लागते. आपण सर्व भाग्यवान आहोत प. पू. स्वामी श्री सवितानंदांचे सानिध्य आपणास प्राप्त झाले, त्यांचा अमृत महोत्सव संपन्न करण्याचे भाग्य आपणास लाभले व या अत्यंत मंगल सोहोळ्याचे आपण साक्षी होत आहोत.

स्वामीजींच्या व्यक्तीमत्वात एका तपस्वी जीवनाचे दर्शन घडते. अन्यथा आम्ही साधुसंत, संन्याशांचे जीवन चरित्राचा शब्दरूपाने परिचय करून घेत असतो व अशी चरित्रे वाचत, अभ्यासत असताना अंतःकरणात एक प्रतिमा आकार घेते व मनांत भाव राहतो की प्रत्यक्ष दर्शन घडले असते तर समाधान, आनंद द्विगुणित झाला असता व ते शक्य नाही अशी मनाची समजूत घालून कल्पनाविश्वावरच समाधान मानावे लागते. स्वामीजींच्या संदर्भात विचार करताना हेच अनुभूतीत येते की एका अत्यंत श्रेष्ठ साधकाचा सहवास आपणास लाभत आहे. आम्ही प्रभावित होतो त्यांच्या अत्यंत साधेपणाने, त्यांच्या मृदु संभाषणाने व आत्मीय व्यवहाराने त्यांच्या भेटीत कर्मठ जीवनाचे दर्शन घडते. कर्मठता व्यक्तिगत स्वरुपात परंतु बाह्यदर्शन अथवा व्यवहारात अंशमात्र सुद्धा कठोरता नाही. तसे हे अत्यंत कठीण आहे. श्रेष्ठ, पवित्र, साधनेशिवाय असे व्यवहारात सहज संभव नाही. वाणीत मधुरता, मृदुता ह्या बरोबरीने दृढता आहे. आग्रहपूर्वक मांडणी आहे परंतु दुराग्रह पूर्णपणे अदृश्य आहे. त्यांच्या वाणीतून, मार्गदर्शनातून त्यांच्या चिंतनाची खोली व गंभीरता लक्षात येते. म्हणून म्हणावेसे वाटते की त्यांचे थोडक्यात बोलणे व प्रेरक दर्शन, व्यवहारातील सहजता, जो जो त्यांच्या सहवासात, संपर्कात येईल तो प्रभावित झाल्या शिवाय राहणारच नाही.

स्वामीजींच्या जेवढे निकट जाल तेवढी अधिक ओळख होत जाते. प्राचीन, भारतीय चिंतनाचे गहन अध्ययन परंतु नुसतीच ज्ञानसाधना नाही तर ते सामान्यातील सामान्य व्यक्तीला समजेल अशा सुलभ व व्यावहारिक भाषेत समजावून सांगण्याची शैली सुद्धा आहे. आमच्या सारखी मंडळी हिंदू किंवा भारतवासी श्रेष्ठ चिंतनाचे वारस म्हणवून घेतो परंतु ते समजणे, समजावून सांगणे एवढेच पुरेसे नसते तर या चिंतनानुसार स्वतःचे जीवन व्यवहार असणेच प्रभावाचे वलय निर्माण करते. स्वामीजींच्या सहवासात त्या वलयाची अनुभूती आपण घेऊ शकतो. त्यांचे प्रवचन, वार्तालापाच्या आधारावर जी ग्रंथनिर्मिती झाली ती अद्भूतच आहे. मग ते त्यांचे स्तोत्र मंत्राचे विज्ञान या विषयावरील लघुग्रंथ असो किंवा अध्यात्माचा परिचय घडवणारी अन्य ग्रंथसंपदा, या ग्रंथसंपदेत सामान्य व्यक्तींच्या अंतःकरणात साधनापथाचे बीजारोपण करण्याचे सामर्थ्य आहे. व आज फार मोठ्या प्रमाणात असे बीजारोपण करून घेतलेले असंख्य पथिक स्वामीजींच्या मार्गदर्शनाने श्रेष्ठ ध्येय समोर ठेवून वाटचाल करीत आहेत. स्वामीजींनी मठ-आश्रम स्वरूपात भव्य भौतिक संपदा तर निर्माण केली नाही परंतु समाज जीवनात शुद्धतेचा संस्कार धारण करून जीवन जगणारी अशी चैतन्ययुक्त मोठी मानव संपदा निर्माण केली आहे. हे सर्व करताना व्यक्तिगत प्रभाव निर्माण करण्याची क्षुद्र भावना अंशमात्र सुद्धा नसणे हेच त्यांच्या

श्रेष्ठत्वाचे द्योतक आहे.

स्वामीजींचे जीवन आणि मार्गदर्शन केवळ आध्यात्मीक साधनेपर्यंत सीमित नाही तर त्याची व्याप्ती देव-धर्म व्यक्तिगत साधनेतून स्वविकासाबरोबरच देश-समाज ह्यासंदर्भात सुद्धा कर्तव्यबोध जागृत करण्यापर्यंत आहे. व्यक्ती व समाज परस्पर पूरकच असले पाहिजेत. समाजातील घडणाऱ्या उचित अथवा अनुचित घटना जर समाजघटकांना प्रभावित करीत नसतील तर समाज घटक चेतनायुक्त आहे की नाही असा प्रश्न निर्माण होतो. स्वामीजी केवळ आपल्या अनुयायांसाठी नाही तर सर्व समाजाला आव्हान करीत आहेत की संवेदनशील बना व संवेदना निराशेकडे, हतबलतेकडे नेणारी नाही तर कर्मशीलतेकडे नेणारी असली पाहिजे हेच त्यांचे मार्गदर्शन विविध साहित्यातून प्राप्त होत आहे.

प्रत्येक व्यक्तीमध्ये अमर्याद सामर्थ्य आहे या विश्वासाने ते सामर्थ्य जागृत करण्याचे कार्य स्वामीजींच्या माध्यमातून होत आहे. आपण भाग्यशाली आहोत अशा प्रवाहात आपणास ही येण्याची बुद्धी प्राप्त झाली. मराठीत म्हण आहे दुरून डोंगर साजरे परंतु स्वामीजींसारखे आभाळाएवढी उंची असलेले व्यक्तीत्व दुरून नाही तर जवळून सुद्धा दर्शन साजरेच आहे.

आपण सर्व एकत्र येऊन स्वामी सवितानंद सेवा समितीच्या माध्यमातून स्वामीजींचा अमृतमहोत्सव संपन्न करित आहात, असा सोहळा करण्याचे भाग्य आपणास लाभले हे अत्यंत आनंददायी आहे.

करवीर पीठाचे प. पू. जगदुरु शंकराचार्य श्री विद्यानृसिंहभारती यांच्या मंगल आशिर्वादाने व प. पू. सरसंघचालक मा. मोहनजी भागवत यांच्या उपस्थितीने संपन्न होत असलेल्या मंगल सोहळ्याचे प्रत्यक्ष साक्षी होता येत नाही, परंतु मनाने उपस्थित राहणारच आहे

ईश्वर स्वामी सवितानंदांना स्वस्थ व संपूर्ण आयुष्य प्रदान करो हीच ईश्वरचरणी प्रार्थना, आपणा सर्व सुहृदांना नमस्कार,

प. पू स्वामीजींच्या चरणी अंतःकरणपूर्वक वंदन-नमन

भवदीय,

सुरेश (भय्या जोशी)

पूर्व सहकार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक

२. पाणी किती आणणार?

- राकेशभाई ईश्वरलाल सोनी, मांडवी

स्वामीजी मला तुमच्याकडून कोणताच सल्ला नको आहे. तुम्ही मला काय सांगाल याची मला पूर्ण कल्पना आहे, नव्हे खात्रीच आहे. पण का कोणास ठाऊक माझ्या मनात जे काही आहे ते तुम्हाला सांगून मोकळे व्हावे, मन हलके होईल एवढेच विचार मनांत वारंवार येतो म्हणून मी मुद्दामच एकटाच तुमच्याजवळ आलो मित्राला न घेता.

खरे तर माझी आणि स्वामीजींची तशी कांही ओळख पण नव्हती. पंधरा दिवसापूर्वी पहिल्यांदाच मी माझ्या एका मित्राबरोबर आश्रमावर आलो होतो. माझा तो मित्र आश्रमावर नेहमीच यायचा. बऱ्याच वेळा स्वामीजींबद्दल काही ना काही सांगायचा पण मला त्यात मुळीच रस नव्हता. तुटपुंजा पगार, घरची वाढती जबाबदारी, आर्थिक ओढाताण यामुळे मी मानसिकरित्या व्यग्र होतो. आतून तूटत होतो मला देवधर्म, साधू-संत कशातच रस नव्हता, कारण त्याने माझे प्रश्न सुटणार नाही अशी माझी खात्री होती. जसे पुरात वाहणारा माणूस कसे तरी हात पाय मारीत किनाऱ्यावर यायचा केविलवाणा प्रयत्न करीत राहातो तसे माझे जगणे होते. परंतु त्या दिवशी मी मित्राच्या आग्रहाने प्रथमच स्वामीजींच्या दर्शनासाठी आलो होतो. साधे पांढरे कपडे, कसलाच थाट नाही. कपडे पांढरे केस पण पांढरे, अगदी साधे सरळ, पण चेहऱ्यावर विलक्षण तेज, एक माया आणि त्याहून मला पटकन स्पर्शून गेलेली एक गोष्ट म्हणजे दाढी मिशा असलेला एक पुरूष संन्यासी. परंतु चेहऱ्यावर मातृवात्सल्याची करूणेची एक वेगळीच आभा. क्षणार्धात माझे मन ओढले गेले, मी काहीच बोललो नाही. मित्राबरोबर त्यांचे जे काही बोलणे झाले असेल ते तिकडे पण माझे लक्ष नव्हते. थोड्यावेळाने आम्ही दोघे परतलो, पण मी स्वामीजींना हृदयात धारण करूनच गेलो. त्यानंतर ठिक पंधरा दिवसांनी मी स्वामीजींना दुसऱ्यांदाच भेटायला आलो आणि का कुणास ठाऊक पण त्यांच्याजवळ स्वत:च मन मोकळे करावेसे वाटले आणि सुरूवात केली वरच्याप्रमाणे. माझे बोलणे ऐकून स्वामीजी शांतपणे म्हणाले, ''ठिक आहे. तुला सल्ला नको आहे तर नाही देणार, तुझे म्हणणे शांतपणे ऐकून घेऊ आणि मी सांगायला सुरूवात केली.''

''स्वामीजी मी अनेक वर्षापासून खाजगी मेडिकल स्टोअर्सवर नोकर म्हणून काम करत आहे. शिक्षण फक्त दहावीपर्यंत. त्यामुळे दुसरी कोणती नोकरी नाही. अनेक वर्षाच्या अनुभवाने मी या नोकरीत आहे. मला महिन्याचे फक्त २५००/- रू. मिळतात, घरात मी, माझी पत्नी व दोन मुले आणि आईवडिल, एवढ्याशा तुटपुंज्या पगारात घर कसे चालवायचे? वाढती महागाई, मुले दिवसेंदिवस मोठी होत आहेत. त्यांना काय आणि कसे शिकवणार? मी एखाद्या मेडिकल स्टोअर्समध्ये नोकरीला लागलो तर माझ्या अनुभवाने कोणते औषध कोठे ठेवायचे, ग्राहकाने मागितल्यावर कसे पटकन काढून द्यायचे यात माझी चांगली हातोटी. होतं असं की दोनतीन वर्षात स्टोअर्सचा मालक पाहून पाहून, विचारून विचारून सगळं शिकून घेतो आणि मग मला 'जायला' सांगतो. मला पुन्हा नवीन स्टोअर्स शोधावा लागतो. आताही मी ज्या स्टोअर्सवर काम करतो आहे.

तो पण पुढच्या महिन्यात सोडावा लागणार आहे, मग पुढे काय? या विचारांनी मला झोप येत नाही. भविष्य सगळे अंध:कारमय आहे. माझ्या सर्व मित्रांना ही परिस्थिती माहित आहे पण ते तरी काय करू शकणार?

परंतु मागच्या आठवड्यात एक गोष्ट घडली. दुकानाचे मालक जेवायला घरी गेले होते, दुकानावर मी एकटाच होतो. चिंतेत आणि विचारात बुडालो होतो. तेवढ्यात एक ग्राहक औषध घ्यायला दुकानावर आला. अधूनमधून यायचा म्हणून फक्त तशी तोंड ओळखच. औषध विकत घेतल्यावर माझ्याकडे पहात म्हणाला, काय झाले भाऊ? तुमच्या चेहऱ्यावर खूप चिंता-तणाव दिसतो आहे, रडवेला पण झाला आहे, काही अडचण? मी म्हणालो, मी आता या दुकानावर आठवडाभर. पुढे काय? म्हणजे? त्याने विचारले. मी त्याला सगळे सविस्तर सांगितले. माझे म्हणणे त्याने शांतपणे ऐकून घेतले आणि मग इकडेतिकडे पाहात जवळपास कोणीच नाही बघून दबक्या आवाजात म्हणाला मुंबई पुण्याकडे माझा एक मित्र आहे तो वेगवेगळ्या प्रकारचे दोन नंबरी धंदे करतो. जर तुम्ही चाळीस-पन्नास हजार रुपयांची व्यवस्था करु शकाल तर त्याच्या मदतीने मी तुम्हाला कोणत्याही विश्वविद्यालयाचे बी. फार्मचे नकली सर्टिफीकेट मिळवून देईन. त्याच्या आधारे तुम्ही स्वत:चे मेडिकल टाकू शकाल, तुमचे सर्व प्रश्न सुटतील. तो माणूस इतक्या आपुलकीने आणि आत्मविश्वासाने बोलत होता की माझा त्याच्यावर विश्वास बसला.

मी त्याला पैसे गोळा करण्यासाठी आठवड्याची मुदत मागितली. मित्रांकडून, नातेवाईकांकडून चाळीस हजार रुपये आणून ठेवले आहेत. उद्या सकाळी तो माझ्याकडे येणार, माझे सगळे प्रश्न सुटणार. मला स्वत:ला कळते आहे की मी हे करतो आहे ते चुकीचे आहे, बेकायदेशीर आहे, अनैतिक आहे पण परिस्थिती खरीच बिकट आहे. ''बुभुक्षिताम् कीम् न करोति पापम्।'' अशी माझी स्थिती आहे. तुम्ही स्वामीजी, तुम्ही हाच सल्ला देणार की हे योग्य नाही, हे करू नकोस वगैरे. पण मी माझा निर्णय घेतला आहे म्हणून आधीच सांगितले मला तुमचा सल्ला नको आहे फक्त मी तुमच्यासमोर मन मोकळे केले एवढेच.

माझे सर्व बोलणे स्वामीजींनी शांतपणे ऐकून घेतले व म्हणाले, आम्ही तुला काही सल्ला देत नाही, फक्त एक प्रश्न विचारतो, तू तुझ्या घरातून एक लोटा घेऊन जा, नळाजवळ जा, विहिरीजवळ जा, तलावाजवळ जा, नदीवर जा, मोठ्या नद्या गंगेसारख्या तेथे जा की थेट समुद्रावर जा, तू पाणी किती आणू शकशील? स्वामीजींच्या या प्रश्नाने मी आश्चर्यचकित होऊन त्यांच्याकडे पाहात म्हटले म्हणजे काय? ''पाणी तेवढेच येईल जेवढा लोटा आहे.'' स्वामीजी हळूच हसले आणि म्हणाले, आम्हाला नेमके हेच सांगायचे आहे तुझ्या नशिबात जेवढी धनसंपत्ती आहे तेवढीच तुला मिळणार मग तू चांगल्या मार्गाने जा की वाईट मार्गाने, नीतीने की अनितिने. पाणी तेवढेच मिळणार जेवढा तुझा लोटा आहे. पैसे तेवढेच मिळणार जेवढे तुझ्या नशिबात आहे.'' स्वामीजींचे बोलणे ऐकून मी उठून घरी गेलो. रात्रभर हे एकच वाक्य कानांत गुंजत होते. ''पाणी किती आणणार? जेवढा लोटा आहे.'' रात्रभर झोपेसाठी तळमळलो पण झोप आली नाही. सकाळी तो माणूस आला, पैसे असूनही माझी द्यायची हिंमत झाली नाही. त्याला सांगितले पैशांची व्यवस्था झाली नाही, आठ दिवसांनी या, तो निघून गेला.

त्यानंतर दोनचार दिवसांनी मला दुकानाच्या कामासाठी सूरतला जावे लागले. मी त्या सरकारी ऑफिसमध्ये गेलो, जेथे मेडिकल स्टोअर्ससाठी लायसन्स काढून मिळते. त्यांचे नियम, त्यांची पद्धती, अर्ज कसा व कोणाच्या नावे करावा याची सगळी माहिती घेण्यासाठी तेथे ऑफिसात गेलो. अनेक वर्षापासून मी याच क्षेत्रात काम करीत असल्याने तेथे अनेकजण ओळखीचे होते. मी त्यातल्या त्यात सिनियर ऑफीसरला यासंबंधी विचारले, तो म्हणाला राकेश पूर्वी हे फार सोपे होते. कोणीही अर्ज द्यावा त्याच्या जोडीला डी.फार्म व

व बी. फार्म चे सर्टिफिकेटची झेरॉक्स कॉपी द्यावी. पंधरा दिवसात आम्ही मंजूर करून लायसन्स द्यायचो. अलिकडेच खोटे/नकली सर्टिफिकेट येऊ लागल्याने सरकारने नियम बदलले आहेत. आता अर्जाबरोबर ओरिजनल सर्टिफिकेट आम्ही मागवतो ते त्या त्या युनिर्व्हसिटीत पाठवून खात्री करून घेतो मगच लायसन्स देतो.

हे सर्व ऐकताच माझ्या पायाखालची जमीन सरकू लागली. अंगाला दरदरून घाम फुटला. मनात आले जर मी त्या दिवशी त्या माणसाला चाळीस हजार रूपये दिले असते तर? ते चाळीस हजारही गेले असते. खोटे सर्टिफिकेटमुळे माझ्या मागे पोलिसांचा ससेमिरा लागला असता. कदाचित पकडलो पण गेला असतो. कदाचित हे ही शक्य आहे की माझ्या परिस्थितीचा, माझ्या अगतिकतेचा फायदा घेऊन प्रलोभने दाखवून मला फसवत पण असेल. या पैकी जे असेल ते. मग माझ्या डोक्यावर चाळीस हजाराचे कर्ज तर झालेच असते जे मी कधीच फेडू फकलो नसतो. बापरे वेगवेगळ्या विचारांनी हादरून गेलो.

दुसऱ्या दिवशी आश्रमावर गेलो. स्वामीजींना साष्टांग दंडवत घालत म्हणालो, स्वामीजी तुमच्या एका वाक्याने मी मोठ्या संकटातून वाचलो! स्वामीजींनी आश्चर्याने विचारले कोणते वाक्य? काय झाले? आम्हाला काहीच आठवत नाही. मी म्हणालो तुमचे ते वाक्य पाणी किती आणशील? रात्रभर माझ्या कानात गुंजत राहिले आणि मग मी वरील सर्व हकिकत सविस्तरपणे सांगितली. स्वामीजींनी करूणापूर्ण दृष्टीने माझ्याकडे पहात म्हटले, तुझ्याकडे तुझी पत्रिका असेल तर घेऊन ये. दुसऱ्या दिवशी मी पत्रिका घेऊन गेलो. स्वामीजी पत्रिका पाहू शकतात हे मला तर माहित नव्हतेच, पण आश्रमावर नेहमी येणाऱ्यांपैकी पण बहुदा कोणाला माहित नव्हते. स्वामीजींनी माझी पत्रिका पाहून म्हटले तुझ्या नशिबात पैसा आहे आणि तोही चांगल्या मार्गाने, नीतीच्या मार्गानेच मिळणार आहे. आता लवकरच शारदीय नवरात्र सुरू होईल. त्या दिवसापासून रोज सकाळ-संध्याकाळ श्री सूक्ताचा पाठ कर. पौर्णिमेला संध्याकाळी लक्ष्मीमातेचा चांदीचा शिक्का असेल तर त्याला गाईच्या दुधाने अभिषेक करीत सोळा आवर्तने कर. माँ भगवती तुझे कल्याण करील.

सांगितल्याप्रमाणे मी शारदीय नवरात्रात श्री सूक्त म्हणायला सुरूवात केली, पौर्णिमेला अभिषेक पण आणि तीनच महिन्यात विलक्षण चमत्कार घडून आला. मला माझ्या मित्राकडून कळाले की मांडवीत एकजण त्याचे मेडिकल स्टोअर्स विकतो आहे किंवा चालवायला द्यायला (भाड्याने) तयार आहे. मी त्याला भेटलो, त्याच्याशी सविस्तर चर्चा केली, नंतर लागलीच स्वामीजींना भेटलो. स्वामीजींनी मेडिकल स्टोअर्स चालविण्याची संमत्ती दिली. आता अडचण होती फक्त पैशांची. मेडिकल स्टोअर्समध्ये जेवढी औषधे व इतर वस्तू होत्या त्याची योग्य ती किंमत करून ती रक्कम रोकड द्यायची आणि दुकानाचे भाडे, त्याचाच डी. फार्म सर्टिफिकेटवर दुकान चालेल म्हणून त्याची ठराविक रक्कम, विजबील, रेफ्रिजरेटर सगळे मिळून दर महिन्याला त्याला सहा हजार रूपये द्यायचे. माँ भगवतीच्या कृपेने व स्वामीजींच्या आशीर्वादाने आवश्यक त्या रकमेची आठवड्यातच व्यवस्था झाली. स्वामीजींनी ३१ जानेवारी वसंत पंचमीचा मूहूर्त सांगितला. सगळी तयारी झाली, पण बऱ्याचदा काही लोक आपण खूप जवळचे आहोत, हितचिंतक आहोत असा आव आणून समोरच्याचा तेजोद्वेष तेजोवध करून त्याचे पाय ओढून खाली पाडण्याचा प्रयत्न करतात. ३० जानेवारीला असेच काही हितचिंतक मला येऊन सांगू लागले, ''राकेश तू या दुकानाच्या मालकाला नीट विचार, त्याची रोजची विक्री कधीच आठशे रूपयांपेक्षा जास्त गेली नाही. म्हणून तर तो हे दुकान बंद करायला निघाला होता, तू त्याच्या जाळ्यात फसला आता तूच गणित मांड रोजची आठशे रूपये विक्री पंचवीस टक्के नफा मालकाला तर तुला रोजचे दोनशे रूपये मिळणार, म्हणजे महिन्याला सहा हजार. तुला त्या माणसाला दर महिन्याला सहा हजार रूपये द्यावे लागणार. मग तू घरी काय पैसे नेणार? काय खाणार? आता सध्या महिना पंचवीसशे का

होईना तू घरी नेतोस. येथून तर पंचवीस रूपये देखील नेऊ शकणार नाहीस. मग पुढे काय? पाचसहा जणांकडून असाच हिशोब, असेच तर्क ऐकून मलाही त्याचे म्हणणे पटू लागले. मी घाबरलो, गोंधळलो. उद्या उद्‌घाटन करायचे आहे आणि आज मी हिंमत हरवून बसलो.

तसाच धावत मी स्वामीजींकडे गेला, सांगितले माझी हिंमत होत नाही, उद्याचा कार्यक्रम रद्द करावा. मी माझी नोकरी चालू ठेवेन. स्वामीजींना वरील सर्व परिस्थिती स्पष्ट केली. स्वामीजींनी सर्व कांही शांतपणे ऐकून घेतले आणि अशा जरब भरलेल्या आवाजात मला म्हणाले, उद्या दुकानाचे उद्‌घाटन करायचे आहे आणि तुला दुकानावर बसायचे आहे. तेथे रोज आठशे रूपये येवो की फक्त आठ रूपये निदान वर्षभर तुला हे दुकान चालवायचे आहे. नफा नुकसान विक्री वगैरे कसलाच विचार न करता आणि घर खर्चासाठी दर महिन्याला आश्रमावरून पंचविसशे रूपये घेऊन जायचे. तुझा वर्षभराचा घरखर्च आम्ही चालवू. दुकानाचा एक पैसा घरी द्यायची गरज नाही. येथून दरमहा पंचविसशे रूपये घेऊन जायचे आणि ते आम्ही कधी परत मागणार पण नाही, त्याचीही काळजी करू नकोस.

स्वामीजींनी एवढे सांगितल्यावर मला सांगण्या, बोलण्यासारखे काही उरलेच नाही. नमस्कार करून उठून निघून गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी स्वामीजींच्या उपस्थितीत ब्राह्मणाकडून छोटीशी पूजा करून घेतली. शांती होम केला आणि विक्रीसाठी काऊंटरवर उभा राहिलो. सर्वात प्रथम खरेदी स्वामीजींच्या शुभहस्ते झाली. त्यांनी विक्स, अमृतांजन व पित्तनाशक गोळ्या असे काही विकत घेतले. स्वामीजीनंतर त्यांच्या आज्ञेने उपस्थित आश्रमाशी जोडलेल्या साधकांनी काही खरेदी केली आणि दिवसभरात पहिल्या दिवशीची विक्री झाली ३५००/- रूपये मनात आले आज उद्‌घाटन होते, अनेकांना निमंत्रण दिले होते. त्यांनी एक शिष्टाचार म्हणून काही ना काही खरेदी केली, म्हणून एवढी विक्री झाली पण उद्या काय? दुसऱ्या दिवशी मानसिक तणावाखालीच दुकान उघडले. संध्याकाळी हिशोब केला तर रक्कम ३५००/- रूपये पेक्षा जास्त माँ भगवतीची कृपा, स्वामीजींचा आशीर्वाद त्यानंतर एकही दिवस असा उगवलाच नाही की विक्रीची रक्कम ३५००/- रूपये पेक्षा एक रूपया पण कमी झाली असेल. कधी चार हचार, कधी पाच हजार, सीझनमध्ये तर दहा हजार पण अगदीच कमीत कमी विक्री ३५००/- रूपये जणू ती लक्ष्मण रेषा त्यापेक्षा कधीच एक रूपया पण कमी नाही वर जेवढे येतील तेवढे.

रात्री उशिरा झोपायचे आणि सकाळी उशिरा उठायचे हा माझा नित्याचा जीवनक्रम होता. अशातच मला आश्रमाच्या समोर राहणारा नरेंद्र भेटला, जो आश्रमाची सेवा करीत असे. नरेंद्र मला म्हणाला, राकेशभाई तुम्ही तर रात्री उशिरा झोपून सकाळी उशिरा उठणारे व्यक्ती आहात तरी तुम्हाला सांगतो नवरात्रीचे नऊ दिवस स्वामीजी आश्रमावर पूजा-पाठ, अभिषेक, हवन, आरती करतात. नऊच्या नऊ दिवस आश्रमावर खूप प्रसन्नमय वातावरण असते. नऊ दिवस तुम्हाला शक्य नसेल तर निदान शेवटच्या दिवशी पूर्णाहुतीला तरी येण्याचा प्रयत्न करा. त्यानंतर मी रोजच्या क्रमाने रात्री उशिरा झोपलो पण दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच मला आपोआप जाग आली. खूप प्रयत्न करूनही मला झोप आली नाही आणि अचानक मला नरेंद्रने आश्रमाच्या कार्यक्रमाविषयी सांगितलेले आठवले आणि स्वामीजींची पण आठवण झाली आणि मी लवकर उठून आंघोळ करून बसने आश्रमावर पोहोचलो. सकाळी सकाळी मला आश्रमावर आलेले पाहून स्वामीजींना आश्चर्य वाटले. ते विनोदाने मला म्हणाले, ''सूर्य आज कुठल्या दिशेला उगवला!'' नवरात्रीच्या प्रथम दिवशी झालेल्या पूजा-अभिषेक आणि आरतीचा मी लाभ घेतला. त्यानंतर स्वामीजींनी हवनाला सुरूवात केली आणि हवनात बसायला मला पण अनुमती दिली. मी पण स्वामीजींना नमस्कार करून हवन करण्याचा आनंद घेतला. त्या दिवशी मी पहिल्यांदाच पाहिले खरोखर पूजा-हवन कशा पध्दतीने होते आणि मी मनोमन संकल्प केला की

मी रोज सकाळी लवकर उठून नऊच्या नऊ दिवस आश्रमावर हवनाला येईन. नवरात्रीच्या दुसऱ्याच दिवशी पूजा, हवन आणि आरती केल्यावर मला वेगळ्याच प्रकारची अनुभूती आली. एक वेगळ्याच प्रकारच मनोबल मला मिळाले की बस आता पुष्कळ झाले. याच्या त्याच्या दुकानावर राबणे खूप केली गुलामगिरी आता मी स्वत:च्या हिंमतीवर स्वतंत्रपणे छोटा-मोठा व्यवसाय करेल. मी माझी मानसिक स्थिती स्वामीजींपुढे मांडली. स्वामीजींनी पण मला मंजुरी दिली आणि त्यांचा अमूल्य आशीर्वाद दिला.

आणि त्यानंतर माझ्या जीवनाला कशी कलाटणी मिळाली त्याच वर्णन मी सुरूवातीला केलेच आहे. दोन भक्कम हात जेव्हा तुमच्या पाठीशी असतात तेव्हा बंद झालेले नशिबाचे दरवाजे 'खुल जा सिमसिम' सारखे कसे उघडतात आणि स्वामीजींच्या कृपेने जीवनात ते मी अनुभवले आहे.

मला दोन मुले, मुलगी नाही. पण माझ्या बहिणीची मुलगी आणि माझ्या मोठ्या भावाची मुलगी या दोघींना पण मी माझ्या मुलीच समजतो. या दोघींची जबाबदारी माझ्या डोक्यावर होती. माझी भाची दर्शना, तिची पण स्वामीजींवर खूप श्रद्धा. माझ्या बहिणीची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने तिच्या लग्नाची संपूर्ण जबाबदारी माझी होती. जेव्हा तिचे लग्न ठरल तेव्हा मी चारीबाजूंनी संकटांनी घेरलो गेलो होतो. तेव्हा माझ्या मनात विचार आला की हे लग्न पुढे ढकलावे किंवा पुढच्या वर्षी करावे. तेव्हा पण स्वामीजी माझ्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले, मला हिंमत दिली आणि त्यांच्याच कृपेने तो लग्नसोहळा खूप छान रितीने आणि आनंदाने पार पाडला. माझ्या भाचीच्या कन्यादानाच पुण्य माझ्या पदरी पडले. आजही त्या क्षणांची आठवण आली तर आश्चर्य आणि आनंदाने माझे हृदय भरून येते. स्वामींजींप्रती कृतज्ञता व्यक्त करायला डोळे वेळोवेळी पाणावतात.

त्यानंतर माझ्या मोठ्या भावाची मुलगी भाविका हिच्या लग्नाची वेळ आली. भाविकाचे लग्न पॅरिस, फ्रान्स मध्ये असणाऱ्या मुलाबरोबर नक्की झाले. माझ्या भावाची परिस्थिती पण बेताचीच. ज्याच्याशी लग्न जमले होते तो मुलगा आणि त्याचे कुटुंबीय यांच्याजवळ भारतात थांबण्यासाठी फक्त चार दिवस होते. भावाने तर विचार केला की, फक्त रजिस्टर मॅरेज आणि एखाद्या मंदिरात साध्या पद्धतीने लग्न करून द्यावे कारण वेळ फार थोडा होता. तेवढ्या वेळात लग्नाची सर्व तयारी आणि पैशांची तजविज करणे शक्य नव्हते. शेवटी एकमेकांशी बोलणी करून आणि वडिलधाऱ्या माणसांच्या सल्ल्याने त्या परिस्थितीत पण लग्न संपूर्ण पारंपारिकरित्या करावे असे ठरले. लग्नाचे सर्व व्यवस्थापन करायला माझ्याकडे फक्त एक दिवस होता कसे होणार! या विचारांनी मला घाबरायला होत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी आश्रमावर मी आणि माझा भाऊ स्वामीजींच्या दर्शनाला गेलो. त्यांचा आशीर्वाद घेतला आणि लग्नाच्या तयारीला लागलो. अवघ्या एका दिवसाच्या अवधीत एकीकडे नातेवाईकांना फोनद्वारे आमंत्रण, दुसरीकडे लग्नाचा मांडव, पाहुण्यांची उतरण्याची व्यवस्था, भोजनासाठी स्वयंपाकी, कामासाठी माणसे, डेकोरेशन, ब्युटीपार्लर अशी अनेक लग्नासाठी आवश्यक कामे केवळ एकच दिवसात पार पडली. रात्रीतून लग्नमंडप उभा राहिला. ज्या लग्नासाठी किमान चार-सहा महिने आधी तयारीला लागावे लागते ती तयारी आम्ही फक्त एकच दिवसात स्वामीजींच्या आशीर्वादाने केली.

या दोनही लग्नात स्वामीजी लग्न पूर्ण होईपर्यंत काही न खाता मला आशीर्वाद द्यायला थांबले होते. माझ्यासाठी तर ही खूप मोठी बाब होती. एक खरा साधू तुमच्या जीवनात कसे परिवर्तन घडवून आणू शकतो याचा जीवंत अनुभव मी वेळोवेळी घेतला आहे. अशा प्रकारे हे लग्न मला स्वप्नवत वाटत होते आणि आजही सगळ्यांच्या आठवणीत राहिलेले आहे.

आज माझ्या या दोन्ही मुली त्यांच्या संसारात खूप सुखी आहेत याचे संपूर्ण श्रेय स्वामीजींना अर्पून मी त्यांच्या चरणी कोटी कोटी वंदन करतो.

आश्रमावर शारदीय नवरात्रात रोजच संपूर्ण चंडीपाठाने (श्री दुर्गासप्तशती) हवन होते. मला संस्कृत येतच नाही, कळत नाही, तरी हवनाच्या वेळी वेगळा विलक्षण आनंद येतो, दैवी तरंगांची अनुभूती होत राहते. एकदा आश्रमावरची सरूताई मला म्हणाली की, राकेश चण्डीपाठमधील एक श्लोक तुला अगदी बरोबर लागू पडतो. मी म्हटले कसे? त्यावर सरूताई म्हणाली, ''चण्डीपाठाच्या अकराव्या अध्यायांतील एका श्लोकाचा उत्तरार्ध आहे की जो भगवतीच्या शरणी जातो तो इतरांना शरण देण्याइतका स्वत:च समर्थ होतो.'' मी म्हणालो, खरे आहे सरूताई तुझे म्हणणे, पूर्वी एकेकाळी माझी अशी परिस्थिती होती की, माझ्या मनांत यायचे माझे नातेवाईक, सारे मित्र यांनी मदत करावी. गंमत अशी की मी कधीच कोणाजवळ याचना केली नाही आणि मला कोणीही स्वत:हून कधीच मदत केली नाही. परंतु जेव्हापासून मी भगवतीच्या आणि स्वामीजींच्या शरणी गेलो, माझी आर्थिक परिस्थिती सुधारत गेली. मानसिक उदारता येत गेली. आपले स्वामीजी तर नि:स्पृह असंग, अपरिग्रही त्यामुळे मला त्यांची कोणतीच आर्थिक सेवा करता येत नाही. त्यांच्याच आज्ञेचे पालन करीत नीतीप्रमाणे वागून धर्ममर्यादेप्रमाणे अर्थार्जन करून मी आज सुखाने संसार करीत आहे आणि त्यांच्याच आज्ञेने धर्माधारीत अर्थार्जनाचा अमूक भाग दान करतो आहे. काही समाजसेवी संस्थांना दान देत राहातो. काही वेळा असे होते की, आसपासच्या खेड्यातून आलेल्या लोकांजवळ पुरेसे पैसे नसतात. डॉक्टरांना दाखवून झाल्यावर औषधाची यादी घेऊन माझ्याजवळ आले की, लिहिलेल्या औषधाचे बिल त्यांच्याजवळ असलेल्या पैशापेक्षा जास्त झाले की ते बिचारे घुटमळतात. मी त्यांना सांगतो औषधं सगळी घेऊन जा जेवढे असतील तेवढे पैसे द्या. उरलेले तुमच्या सवडीनुसार केव्हाही द्या. मी माझ्या खिशातून पैसे टाकून हिशोब बरोबर करतो. काही जणांकडून पैसे येतात. काही जणांकडून नाही. त्याची मी खंत करीत नाही. मला समाधान एवढेच की, माझ्या दुकानावर आलेल्या गरीब माणसाला पैश्याअभावी मी औषधावाचून पाठविले नाही. जमेल तशी इतर गरीब व गरजूंना मदत करतो त्यासंबंधी अधिक सांगणे योग्य नाही.

मी आज भले अंबानी की टाटाप्रमाणे धनवान नाही परंतु त्यांच्यापेक्षाही स्वत:ला सुखी आणि समाधानी म्हणवुन घेऊ शकतो कारण की एकेकाळी माझ्याजवळ जुनी सायकल घ्यायला पण पैसे नव्हते पण आज मोटरसायकल, कार आणि एक सुंदर दुमजली घर पण आहे आणि हे फक्त आणि फक्त स्वामीजींच्या आशीर्वादाने. स्वामीजी माझ्या जीवनात आले आणि त्यांच्यामुळेच आज मी संपुर्ण तऱ्हेने आनंद आणि सुख अनुभवतो आहे. माँ भगवतीला नेहमी एकच प्रार्थना की स्वामीजींच्या वटवृक्षरूपी आशीर्वादाची छाया माझ्यावर सदैव राहो.

३. संजीवनी बुटी

– श्री. नरेंद्रसिंह मुळोदरा (तरसाडा)

सरूताई, तुला खरेच सांगतो स्वामीजी जर माझ्या जीवनात आले नसते तर मी आतापर्यंत जगलो तरी असतो का? हा मोठा प्रश्न आहे. ही मोठी शंका आहे. कारण स्वामीजींच्या भेटीपूर्वी माझ्या मनांत वारंवार आत्महत्येचे विचार यायचे. पण आत्महत्या करण्याची माझी हिंमत होत नसे. अनेकदा असा विचार करायचो की मी चालत असताना किंवा सायकलवर वा मोटरसायकलवर असताना समोरून किंवा मागून एखाद्या बसने किंवा ट्रकने जोराची धडक मारावी आणि मी जागच्या जागी मरावे हाच विचार माझ्या मनांत कायम घोळायच. पण माझी काही मागच्या जन्माची पुण्याई असेल, स्वामीजी तरसाड्याला आले आणि माझ्या घरासमोरच आश्रमाचे बांधकाम सुरू केले. मी स्वामीजींशी कधी बोलायचो नाही, भेटायचो नाही, दुरून त्यांना फक्त पाहायचो. मन त्यांच्याकडे ओढले जायचे परंतु पोटासाठी, घर परिवारासाठी मला जो संघर्ष करावा लागायचा सकाळी घरातून लवकर बाहेर पडायचे, संध्याकाळी उशीरा यायचे. सकाळी जातानाच सात वाजता काहीतरी खाऊन जायचे आणि रात्री थेट घरी आल्यावरच खायचे. दिवसभरात मी कोठेही काहीही खायचो नाही, चहा तर पितच नव्हतो पण भूक लागली तरी नाश्ता करायचो नाही. कारण त्यासाठी खिशात पैसेच नसायचे. घरची परिस्थिती आठवली तरी अंगावर काटा येतो. कशा परिस्थितीतून मी स्वामीजींच्या कृपेने बाहेर पडलो ते आठवले तर कृतज्ञता व्यक्त करायला माझ्याजवळ शब्दच नाहीत.

मी त्यावेळी फक्त नववीत होतो. अभ्यासात हुशार होतो, तेजस्वी होतो, पुढे शिकायची खूप इच्छा होती, परंतु घरची परिस्थिती अचानक अशी बदलायला सुरूवात झाली की मला शाळा सोडून दोन पैसे कमविणे भाग पडले. घरात माझ्यापेक्षा एक लहान भाऊ, एक लहान बहिण व आई. वडिलांविषयी न लिहिणेच बरे. त्यांचे असणे नसणे आमच्यासाठी सारखेच होते. घरात आईची, लहान बहीण, भावाची उपासमारीची स्थिती सहन होईना म्हणून मीच शाळा सोडायचा निर्णय घेतला. शिक्षण नाही आणि वय १५ वर्षाचे पण नाही. मला कोण आणि काय नोकरी देणार? समोर मांडवी तालुक्याचे गांव पण आदिवासी भाग, कसलीच कांही प्रगती नसलेले गांव. उद्योगधंदे नाहीत. मला काय काम मिळणार? मांडवीत एक व्यक्ती होती परिस्थितीने आणि स्वभावाने पण श्रीमंत, अनेक गरजूंना मदत करायचे. स्वभाव खूप चांगला पण पैसे कमविण्याचा धंदा मात्र वाईट अनैतिक. पोलीसाशी व सरकारी ऑफीसरशी त्यांनी संबंध खूप चांगले ठेवले असल्याने त्यांना काहीच त्रास व्हायचा नाही. त्यांनी मला काम दिले मटक्याचे आकडे, लोक जे नोंदवायचे ते लिहून ठेवायचे. माझे वय लहान होते, शिक्षण कमी होते तरी मला कळत होते की हे योग्य नाही. पण गरजवंताला अक्कल नसते. घरात दोन वेळ नाही तर निदान एक वेळ तरी खायला मिळावे यासाठी नाईलाजाने मन मारून मी हे काम स्वीकारले. परंतु मन सतत तडफडायचे, या कामामुळे माझी काही लोकांशी ओळख झाली आणि त्यातून मला हिरे घासण्याचे काम मिळाले. माझ्या हुषारीने परिस्थितीने सर्व काम फार लवकर शिकलो. त्या काळात मांडवीत हिरा घासणारे अनेक कारागीर होते, त्यांना घंटी म्हणायचे. मी लवकरच सर्व काही आत्मसात करून महिना तीन हजार रूपये कमवू लागलो. आता दोन वेळच्या जेवणाची चिंता नव्हती. लहान बहिण भावाचे शिक्षण व भविष्यात बहिणीच्या लग्नाची चिंता. मन कोरून खायचे. पोटाचा प्रश्न सुटला, पण बाकीचे प्रश्न आ वासून उभे होते. या माझ्या संघर्षाच्या काळातच स्वामीजींनी माझ्या घरासमोरच आश्रम बांधला आणि ते त्यांच्या मोठ्या भगिनींसह

(गृहस्थाश्रमातील पण आणि गुरूमहाराजांकडून दिक्षा घेतल्याने गुरूभगिनी पण) येऊन राहिले. साध्वी दयामयींच्या प्रेमळ स्वभावामुळे आम्ही हळूहळू त्यांच्याशी जोडले गेल्यावर त्या रोज दुपारी तासभर आमच्या घरी येऊन बसायच्या. आईला व लहान बहिणीला चांगल्या गोष्टी समजावून सांगायच्या. मी दुपारी घरी नसायचो. संध्याकाळी ताईंजवळ जाऊन बसायचो. स्वामीजीबद्दल आदरयुक्त भिती होती म्हणून मी स्वामीजींशी फारसे बोलायचे नाही. ताईशी मात्र माझ्या चांगल्या गप्पा व्हायच्या. पण हळूहळू माझ्या लक्षात एक गोष्ट येऊ लागली की, स्वामीजींच्या नुसत्या जवळ गेलो तरी शरीरात मनात एक वेगळ्याच उर्जेचा संचार व्हायचा आणि माझ्या मनातले नकारात्मक विचार नष्ट होऊन जीवन जगण्याचे चांगले सकारात्मक विचार येऊ लागले. स्वामीजींशी मी या विषयावर कधीच काही बोललो नाही, पण आत्महत्येचे किंवा कोणीतरी मला अपघात करावा, बस-ट्रकने ठोकर मारावी, मरून जावे हे सगळे विचार आपोआपच कापूर जळून जावा तसे जळून गेले. मलाच कळले नाही की हा बदल कसा आणि केव्हा होत गेला. आता जीवन जगण्याचा आनंद वाटू लागला.

स्वामीजी माझ्याशी बोलायचे, चांगल्या मनमोकळेपणे बोलायचे पण मला अध्यात्मात, साधन-भजनामध्ये काहीच रस नसल्याने त्यावर स्वामीजींशी चर्चा व्हायची नाही आणि स्वामीजी सांसारिक विषयांची फारशी चर्चाच करायचे नाहीत, परंतु त्यांच्याजवळ नुसते बसायचो. मला आतून शांत व प्रसन्न वाटायचे. मनात यायचे स्वामीजींपासून उठून दूर जाऊच नये, इतके मन ओढ घ्यायचे. याचा एक मजेशीर परिणाम झाला. मी जातीने दरबार म्हणजे क्षत्रिय-रजपुत समाजाचा. स्वाभाविकच मांसाहार करायचो. पण ज्या दिवशी मी घरी असे कांही आणून खाल्ले की मग त्यादिवशी संध्याकाळी मला स्वामीजींसमोर जायची लाज वाटायची. मग मी पुढील ३/४ दिवस स्वामीजींसमोरे जायचोच नाही. मन ओढ घ्यायचे पण समोर जायची लाज वाटायची आणि त्यामुळे मग मी निर्णय घेतला की मांसाहार बंद करायचा. आधी मी माझ्यापुरता बंद केला, घरच्या लोकांसाठी आणून द्यायचो. परंतु हळूहळू घरातील सर्वजण म्हणू लागले आपण हे सारे बंद करू आणि आमच्या घरात मांसाहार पूर्ण बंद झाला.

त्या काळात स्वामीजींना राजस्थानात जायचे होते. माझ्या हिऱ्याच्या कारखान्याला पण पंधरा दिवसाची सुट्टी होती. मला प्रवासाची, फिरण्याची खूप हौस. स्वामीजींना हे माहित होते. स्वामीजींनी मला विचारले, येतोस का राजस्थानात? मी विचारात पडलो. प्रवासाचे भाडे, तेथे राहणे, जेवण इतर खर्च मला कसे शक्य आहे? स्वामीजींनी माझ्या मनातले विचार ओळखले आणि हसून म्हणाले, बाकीच्या गोष्टींची तू चिंता करू नकोस. फक्त हो म्हण. मी हो म्हटले. पण आमच्या जवळच्या नातेवाईकांनी तथाकथित हितचिंतकांनी आईचे कान भरायला सुरूवात केली. याला येथून घेऊन जातील, संन्यासी करून टाकतील, हा पुन्हा घरी परत येणार नाही. स्वामीजींबरोबर पाठवू नका. माझी आई अडाणी, अशिक्षित खरी पण समजदार. ती म्हणायची त्याच्या नशिबात जे होणार असेल ते होईल. मी कशाला त्याला अडवू? आणि मी स्वामीजींबरोबर राजस्थानात गेलो. त्यांच्या सहवासाने मला दोन गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. पहिली गोष्ट माझ्यात झालेला एक वेगळाच बदल. पूर्वी मला बसमध्ये, जीप-कारमध्ये बसलो की लागलीच उलट्या सुरू व्हायच्या. त्या दिवशी रात्री मी स्वामीजींबरोबर शेजारच्या खुर्चीवर (सीटवर) बसलो होतो. मला ओकारी देखील आली नाही. उलटी होण्याची गोष्ट दूरच आणि आश्चर्याची गोष्ट सांगतो त्यानंतर मला कधीही उलटी झाली नाही. आता तर मी स्वत:च कार चालवतो. इतकेच नव्ह तर आश्रमावर येणाऱ्यापैकी माझ्या परिचयाचे १०/१५ बंधु भगिनींना ज्यांना पण माझ्यासारखाच बस-कारमध्ये बसल्यावर उलट्या व्हायच्या. त्यांनी स्वामीजींबरोबर प्रवास केला त्या सर्वांना उलट्या होण्याचा त्रास थांबला. आता त्यांच्यापैकी कोणालाच कसलाच त्रास नाही. त्यांच्यापैकी कित्येकजण तर स्वत:च वाहन चालवतात. हा चमत्कार कसा घडला? माझ्याच बाबतीत नाही अन्य १०/१५

जणांच्या बाबतीत जे विज्ञानाला कधीही न उलगडणारे कोडे आहे. दुसरी वेगळी आणि विलक्षण गोष्ट अशी की, स्वामीजी तरसाड्याच्या आश्रमात आम्हा सर्वांशी सहज मिसळायचे, गप्पा गोष्टी करायचे, त्यामुळे स्वामीजी किती मोठे व महान आहेत हे मी राजस्थानात त्यांच्याबरोबर प्रवासात गेल्यावर कळाले. संपूर्ण प्रवासात स्वामीजींना कधीही जमीनीवर पाऊल ठेवावे लागले नाही. कोठेही जायचे असेल तर त्यांना घ्यायला कार येऊन उभी राहायची. मारूती कार पासून ते त्या काळातल्या सगळ्या महागड्या कारपर्यंत. पण स्वामीजींचा तोच तटस्थपणा, शांतपणा. कलेक्टरपासून दुसरे अनेक मोठे लोक, उद्योगपती व समाजातील तेथील मान्यवर लोक स्वामीजींच्या भेटीसाठी/दर्शनासाठी, सत्संगासाठी आतुर असायचे. स्वामीजींच्या सहवासात राजस्थानातील १५ दिवस कसे गेले कळलेच नाही. स्वत:च्या गाठीचा एक पैसाही खर्च न होता. उदयपूर, चितौड, भिलवाडा, नाथद्वारा, काकरोली, अजमेर, पुष्कर, जयपूर असे अनेक महत्वाची स्थळे मी पाहिली. तेथील स्वामीजींच्या संपर्कातले लोक किती श्रध्देने, प्रेमाने स्वामीजींची सेवा करायचे ते पाहून माझ्या मनात विचार यायचा तेच का हे स्वामीजी? आणि त्यांना तेथेही काही फरक पडत नव्हता. माझ्यासारख्या अल्पशिक्षित, आर्थिक विपन्न तरूणाबरोबर पण तसेच राहणे, वागणे, बोलणे. मी घरी परतलो आणि आईची कानभरणी करणाऱ्या लोकांचे चेहरे पाहण्यासारखे झाले.

प्रवासातून परत आल्यावर माझ्यापुढे प्रश्न उभा राहिला घराचा; घर जुने, मातीचे कधी पडेल ते सांगता येत नाही. पावसाळ्यात गळायचे आणि घराच्या मागे शेतीची जमीन, खूप मोकळी जागा पण त्यामुळे माझ्या घरात पावसाळ्यात कायमच सापांचा मुक्काम असायचा. एकाला पकडून सोडून आलो तर दोन दिवसात दुसरा पाहुणा यायचा. तशातच लग्नाचे वय झाल्याने मुलीकडचे यायचे, पण घराला संडास, बाथरूम नाही म्हणून कोणी मुलगी द्यायला तयार होईना. ही गोष्ट माझ्या आईकडून साध्वीताईंना कळाली. ताईंनी स्वामीजींना सांगितले. स्वामीजींनी दुसऱ्याच दिवशी गवंड्याला फोन करून बोलवून घेतले आणि पंधरा दिवसात संडास बाथरूम बांधून झाले. त्याचवेळी आमच्या रजपूत समाजाचा सामुहिक विवाहाचा कार्यक्रम नक्की झाला. सुदैवाने एक 'स्थळ' पण आले. सामुहिक विवाहासाठी आवश्यक पैसे स्वामीजींनी भरले. नवरदेवासाठी म्हणजे माझ्यासाठी वरात जायला कारची व्यवस्था आणि नातेवाईकांसाठी बसची व्यवस्था पण स्वामीजींनी केली. लग्न झाले संसार सुरू झाला.

स्वामीजींना व साध्वीताईंना बिहारमध्ये गुरूमहाराजांच्या आश्रमावर जायचे होते. त्याचवेळी आश्रमावर निर्माणकार्य पण सुरू होते. स्वामीजींनी मला विचारले तू लक्ष ठेवशील का? येथे सगळे सांभाळशील का? मी जबाबदारी स्विकारली. स्वामीजी महिन्याभराने परतले. येथले सगळे काम आटोपले होते. मी महिनाभर हिरा घासायला गेलोच नाही. माझी महिनाभराची मजूरी बुडाली तरी मनात सेवा केल्याचा संतोष होता. स्वामीजींनी माझ्यासाठी खूप काही केले होते. त्या ऋणातून मुक्त होण्याची अल्पशी संधी मिळाली होती. मी ती संधी साधली एवढेच. परत आल्यावर स्वामीजींनी माझ्या झालेल्या आर्थिक नुकसान भरपाईसाठी रक्कम देऊ केली ती मी नम्रपणे नाकारली.

त्याच वर्षी उन्हाळ्यात घरचे काम करणे अत्यावश्यक होते. कोठून तरी कसेतरी पंचवीस हजार रूपये एकत्र केले. घर पाडले, घराच्या मागच्या बाजूला मोकळ्या जागेत तंबू बांधून राहण्याची व्यवस्था केली. गोळा केलेले २५ हजार रूपये स्वामीजींजवळ ठेवले. त्यावेळी पण माझ्या तथाकथित हितचिंतकांनी पुन्हा मला व माझ्या आईला सांगायला सुरूवात केले. एवढे पैसे स्वामीजींजवळ देऊ नका. उद्या ते नाही म्हणून गेले तर काय करणार? मी त्यांच्याकडे बघुन हसून दुर्लक्ष करायचो. माझे मलाही कळत होते की पंचविस हजारात घर बांधले जाणार नाही. माझी धडपड चालू होती कोठून तरी कर्ज मिळवायची. पण माझ्यासारख्या हिरेघासू कामगाराला

कोण कर्ज देणार? मोठी रक्कम कोणत्या भरवशावर देणार? पुन्हा एकदा स्वामीजी पाठीशी उभे राहिले. त्यांनी मला सांगितले, तू फक्त गवंडी आणि मजुरांची व्यवस्था कर बाकीच्या सर्व मालसामानाची व्यवस्था आम्ही करून देतो. घराच्या पायासाठी दगड, नंतर विटा, सिमेंट, रेती हा सर्व खर्च स्वामीजींनी केला. त्यानंतर काही मी नंतर आग्रहाने थोडे थोडे पैसे देऊन अंशत: फेड केली. तरी एकूण खर्चाच्या पन्नास टक्के खर्च तर स्वामीजींनी केला. पन्नास टक्के मी व माझ्या लहान भावाने मिळून.

अधूनमधून दुर्दैवाचा ससेमिरा मागे लागायचा. अचानकच हिऱ्याच्या धंद्यात मंदी आली. अनेक कारखाने बंद होऊ लागले. माझ्यापुढे पण चिंतेचे सावट उभे राहिले. मी ऐकले आहे, महाराष्ट्रात एक महान संत सत्पुरूष होऊन गेले. त्यांचे एक प्रसिद्ध वाक्य आहे, ''भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे.'' माझ्या बाबतीत पण हेच खरे होते. स्वामीजी माझ्या पाठीशी उभे होते. मांडवीमधील एका शाळेत शिपायाची जागा खाली होती. स्वामीजींनी ट्रस्टींना माझ्यासाठी विनंती केली, त्यांनी तत्काळ मान्य केली. त्या जागेसाठी मांडवीच्या एका वकिलाने त्याच्या नातेवाईकाला घ्यावे म्हणून ट्रस्टीना सत्तर हजार रूपये तयार असल्याचे सांगितले. पण ट्रस्टींनी स्वामीजींशी असलेले संबंध आणि स्वामीजींना दिलेले वचन लक्षात घेऊन ते नाकारले. आता माझ्यापुढे प्रश्न होता की मी हिरे घासून महिना ४/५ हजार रूपये कमवित होतो ते सोडून ही नोकरी स्विकारली तर ५ वर्ष पर्यंत निश्चित पगार म्हणजे महिना फक्त १५००/- रूपये मिळणार. त्यात घर कसे चालवणार? मी स्वामीजींसमोर प्रश्न मांडला. स्वामीजी संन्यासी असले तरी त्यांचे व्यावहारीक ज्ञान सर्व सामान्यापेक्षा विलक्षण. त्यांनी मला तीन मुद्दे समजावून सांगितले. पहिली गोष्ट भले तू आता ४/५ हजार रूपये कमवत असशील पण हे काम तू वयाच्या किती वर्षापर्यंत करू शकशील? बाजरीच्या दाण्याच्या आकाराचा हिरा तो घासायचा. ते फार फार तर वयाच्या पन्नासाव्या वर्षापर्यंत करू शकशिल. तूच बघ तुझ्या कारखान्यात, इतर कारखान्यात कोणी पन्नासच्या पुढे आहे का? तू ही नोकरी वयाच्या ५८/६० पर्यंत करू शकशील. दुसरी गोष्ट दिवसेंदिवस शिक्षणाचा खर्च वाढत चाणार. तू हिरा घासून मुलांना शिकवू शकणार नाहीस. शाळेत नोकरीला लागलास तर तुझ्या मुलांना शाळेत फी माफी मिळेल. इतर सवलती मिळतील. तू त्यांना विनाखर्च बारावी पर्यंत सहज शिकवू शकशील. मधल्या काळात तुला त्यांच्या उच्चशिक्षणासाठी पैसे गोळा करणे शक्य होईल. तिसरी गोष्ट १५००/- रूपये पगार पांच वर्षापर्यंत. त्यानंतर तुला कमीत कमी १५,०००/- तरी मिळतील. म्हणजे या पाच वर्षाचे नुकसान तू वर्ष दीड वर्षात भरून काढशील. राहिली गोष्ट घर खर्चाची त्याची व्यवस्था आम्ही करून देतो.

माझा धाकटा भाऊ कुशल इलेक्ट्रीकल मेकॅनिक, मोटरसायकल रिपेअर करण्यात त्याचा हातखंडा. तो एका दुकानावर काम करायचा. महिना २०००/- रूपये मिळायचे. स्वामीजींनी त्याला समजावून सांगितले, आम्ही भोजनाची व्यवस्था करून देतो. तू मांडवी मार्केटमध्ये भाड्याचे एखादे दुकान शोध. तेथे मोटरसायकलच्या स्पेअर पार्टचे दुकान टाक. गाड्या रिपेअर पण कर, स्पेअर पार्ट पण विक. बऱ्याचदा समजावून सांगितल्यावर भाऊ तयार झाला आणि त्याने दुकान सुरू केले. आधीपासून त्याच्या ओळखी होत्या, पटकन जम बसला. दुकान चांगले चालू लागले, भरपूर काम मिळू लागले. घरखर्चाची चिंता अगदीच मिटली. सहजगत्या माझी पांच वर्ष निघून गेली. नोकरीत कायम झालो. आता ३० हजार पगार घेतो. पूर्वीच्या सर्व आर्थिक अडचणीतून बाहेर येऊन आता सुखाने संसार करीत आहे. ज्या अडचणी, जे दु:ख मी भोगले ते माझ्या व माझ्या भावाच्या मुलांना भोगावे लागले नाही. आम्ही आता मध्यमवर्गीय लोकांप्रमाणे सुखासमाधानाने जगत आहोत. भले खूप पैसे नसतील पण कसलीच ददात पण नाही. हे सगळे स्वामीजींच्या कृपेने शक्य झाले. सरूताई मला स्वत:वर लिहिता येणार नाही हे सर्व म्हणून तुला तोंडी सांगितले. आता तूच लिहून काढ सर्व.

- नरेन भाई

४. स्मरणमात्रे

– सौ. दीपाली अविनाश काळे, मुंबई

नमस्कार,

बघता वळून मागे–

मनुष्य भेटी गाठी, सूर जुळणे, सगळे परमेश्वराधीन आहे. स्वामीजींची भेट होणे आणि गुरु म्हणून लाभणे आमचे सुदैवच. स्वामीजींचे 'स्तोत्र मंत्राचे विज्ञान' हे पुस्तक माझ्याकडे साधारण १५ वर्षांपूर्वी झेरॉक्स स्वरुपात आले पण त्यावर लेखकाचे नाव नव्हते. मला ते पुस्तक खूप भावले. त्यातील एक दोन गोष्टींचा मी उपयोग पण केला. कोण बरे हे लेखक? असा विचार मनात अनेकदा आला. घरात तेव्हा कोणालाच वेळ नव्हता. मुलांचे तेव्हाचे जग वेगळे. पतिराज पण नोकरीमुळे कामात अत्यंत व्यस्त. ते निवृत्त झाल्यावर त्यांचे या पुस्तकाकडे लक्ष गेले. पुस्तक वाचून पतिराज खूप प्रभावित झाले.

प्रसाद प्रकाशनाचे आम्ही खूप वर्षांचे वाचक, वर्गणीदार आहोत. तेथे या पुस्तकाचे लेखक 'स्वामी श्री सवितानंद' ही माहिती मिळाली व स्वामीजी तिथे नेहमी येतात असे पण कळाले. स्वामीजी प्रसाद प्रकाशन संस्थेत अमूक दिवशी येणार आहेत हे कळल्या बरोबर आम्ही मुलुंडहून खास त्यांना भेटाण्यास गेलो. यालाच म्हणतात योग, सुदैव, पूर्व जन्मीचे सुकृत.

पू. स्वामीजी पण एवढे आस्थेवाईक, प्रेमळ की लगेच ह्यांना म्हणाले, ''पुण्याला कशाला आलात? आम्ही मुलुंड्ला येत असतो.'' आणि स्वामीजींनी लगेच सौ. स्वाती मरकळे यांचा फोन नंबर दिला. नंतर एक दिवस श्री. काळेंनी सौ. स्वातीला फोन केला तर त्याच दिवशी स्वामीजी येणार होते. आम्ही दोघे त्या दिवशी लगेच स्वामीजींना भेटण्यास गेलो. अशा मोठ्या साधू संतांना भेटताना एक प्रकारचे दडपण येते. दोन वेळा भेटल्यावर मग भीतभीत त्यांना आमच्याकडे येण्याविषयी विचारले तर ''पुढच्या वेळी येईन'' असे ते म्हणाले. मग आमचा आनंद काय वर्णावा!

गेले ३०/४० वर्ष आमची देवाची भक्ती चालू होती. पण मनात तळमळ होती आपली उपासना वाढावी. या संसार मोहातून दूर व्हायला मदत व्हावी. देव खरच भेटतो का ? तो भेटण्यास कोणी मार्गदर्शन करेल का ? स्वामीजींची भेट झाल्यावर आपल्याला काहीतरी गवसले असे वाटू लागले. मग पू. स्वामीजी आमच्याकडे आले. रात्री मुक्काम पण केला. तेव्हापासून आमच्या घरदाराला त्यांचा प्रेमळ वरदहस्त, कृपा लाभली आहे.

का कोणास ठाऊक पण स्वामीजींना भेटल्यावर परत परत त्यांना भेटावेसे वाटते. त्यांच्या संभाषणातून नकळत काही विचार डोक्यात पक्के बसतात. त्याप्रमाणे काहीतरी आचरण केले जाते. माणसाची पारख तर स्वामीजींना अफाट आहे. अर्थात ते अंतर्ज्ञानी, मनकवडे आहेतच. विज्ञान आणि अध्यात्म यांचा सुरेख संगम म्हणजे स्वामीजी. त्यांचे विचार विज्ञानाच्या कसोटीवर उतरतात. म्हणून मग बुध्दीनिष्ठ व्यक्ती किंवा पुरोगामी विचारवंत पण विचारात पडतात. आपले सणवार, तिथी, नक्षत्र यामागे विज्ञान आहे, त्याप्रमाणे आपण आचरण केले तर शारिरीक, मानसीक व आत्मीक बल लाभते. पण आपण सगळे पाश्चात्य विचारसरणीने इतके

भारावलेले आहोत की आपले सगळे विचार अथवा संस्कृती त्याज्य असेच मानले जाते. (आजकाल थोडा फरक पडू लागला आहे.) हा वैज्ञानिक दृष्टीकोनातून स्वामीजींनी 'स्तोत्र मंत्राचे विज्ञान' या पुस्तकातून समजावला आहे.

'आधी केले मग सांगितले' असे वर्तन करणारे स्वामीजी १९७६ साली गुरुच्या शोधात संसार सोडून, घरदार सोडून निघतात. दहा हजार किलोमीटर अनवाणी चालतात. (आज ही अनवाणीच असतात.) १९८१ साली संन्यास घेतात. तो पर्यंतचा शारिरीक, मानसिक, अध्यात्मीक, परमेश्वरीय अनुकृपेचा प्रवास थक्क करणारा आहे. स्वामी विवेकानंदाप्रमाणेच ते अत्यंत हुशार, रसिक, काव्यप्रेमी, नेमस्त, वक्तशीर, थोडेसे कठोर पण प्रेमळ आहेत. आजच्या ह्या विज्ञान युगात ही गुरु भेटतो, कठोर परीक्षा घेतो हे पण विचार करण्यासारखे आहे. स्वामीजी आज संत तुकारामांसारखे 'आता उरलो उपकारापुरता' असेच आहेत.त्यांच्याच शब्दात सांगायचे

आत्मदृष्ट्या एकरुप । जीवदृष्ट्या तुझे रुप । देहदृष्ट्या मी सेवक । जगन्माते ।।

(ओवी १९३ - येणे वाग्यज्ञे तोषावे)

ते आपल्यात असे मिसळतात की हे लक्षातच येत नाही. पू. स्वामीजी आभाळा एवढे उंच आहेत. प्रचंड ज्ञानी आहेत, तसेच त्यांची माया पण आभाळमायाआहे. अनेक सिध्दी प्राप्त होऊनही त्यांनी सिद्धींचा त्याग केला आहे.

गिरनार पर्वतावर प. पू. अमृतगिरी बापूंची लाभलेली कृपा, दत्तात्रेयांची कृपा, गुरुजींनी करुन घेतलेली उत्तम शिष्य होण्यासाठीची तयारी, ऋषीकेशला संत लक्ष्मणदासांचा स्वामीजींना लाभलेला सहवास हे पूर्व सुकृत नक्कीच म्हणावे लागेल.

''मुमुक्षत्व व तितिक्षा तीव्र झाल्याशिवाय गुरु भेटत नाही. साधक मित्रानो गुरुंची परीक्षा ही शाळा कॉलेजची परीक्षा नाही. परीक्षेची तारीख, वेळ तुम्हाला कळणार नाही. परीक्षा घेतली तरी कळणार नाही म्हणून प्रत्येक क्षणी जागृत रहावे. मग हा बोध आपण लक्षात ठेवणार ना? मनुष्यत्व, मुमुक्षत्व व गुरु लाभणे हे दुर्लभ असते.''

दुर्लभम् त्रैमेवैतद देवानुग्रहहेतुकं । मनुष्यत्वम् मुमुक्षत्वम्महापुरुषसंश्रय ।।

(विवेकचूडामणि)

स्वामीजी गुरु म्हणून लाभले हे आमचे भाग्य, पण शिष्य म्हणून आम्ही अजून बालवाडीचेच विद्यार्थी आहोत; खूप पल्ला गाठायचा आहे, पण प्रवासाला सुरुवात झाली हाच आनंद. आम्हाला सदैव तेच गुरु म्हणून लाभावेत हीच माँ अंबेच्या चरणी प्रार्थना

प्रार्थना मातेस

आहे एक आश्रम भला
तापी नदीच्या तिरी
'सूर्यकन्या' कुटीर नाव
आहे खरे साजिरे
राहे त्यात एक तपस्वी
नाव सवितानंद असे
रवी समान तळपतो
तेजस्वी तो दिसे
बघताच त्याकडे
आदर वाटत असे
चरणी पडता तयाच्या
शांती जीवा मिळतसे
गोष्टी वेल्हाळ असूनी तो
उपदेश सहज करी
विचारात मग मती
गुंगुनी जातसे
'अवधूत' उपाधी ही
संन्यास क्षेत्रातली
आज्ञा अंबेची म्हणूनी
आला हिमालय सोडूनी
अज्ञानी अविचारी आम्ही
संसारीजन हे असे
उध्दार करण्या आमुचा
तो सदैव तत्पर असे
अमृत वरीस हे तयाचे
आमुच्या भाग्यात असे
लाभो शतायुषी जीवन तया
प्रार्थना मातेस असे.

– सौ. दीपाली अविनाश काळे, मुंबई

५. स्वामीजी

ज्ञानाचे हो सागर तुम्ही, महिमा तुमचा अपरंपार
तव चरणांवर नमवितो आम्ही मस्तक आमचे वारंवार ।।धृ.।।
स्वामीजी ओ स्वामीजी, स्वामीजी ओ स्वामीजी

खऱ्या भारतीय संस्कृतीचे दर्शन तुम्ही घडवियले
एकाहून एक अद्भुत ग्रंथांनी ज्ञान आमचे वाढवले
ज्ञानचक्षु उघडून करवला परमात्म्याचा साक्षात्कार ।।१।।
तव चरणांवर नमवितो आम्ही............

आत्मबोधाचे दालन तुम्ही आमच्यासाठी उघडिले
देवघरातल्या ग्रंथांनाही वाचनसुलभ तुम्ही केले
अथांग ज्ञानाचे तुम्ही आम्हास समजाविता सार ।।२।।
तव चरणांवर नमवितो आम्ही............

ललितमधुर भाषेत वर्णन करण्याची तुमची हातोटी
ऋषीतुल्य स्वामीजी तुम्हाला वंदन कोटी-कोटी
आम्हासारख्या पामर जीवांचे तुम्हीच जीवनाधार ।।३।।
तव चरणांवर नमवितो आम्ही............

बालकाची निर्मळ, निरागसता तुमच्या ठायी वसते
तुमचा मिश्किल स्वभाव आठवून मन एकांतीही हसते
तुमच्या केवळ दर्शनानेही होतो आमचा श्रमपरिहार ।।४।।
तव चरणांवर नमवितो आम्ही............

तुमच्या मार्गदर्शनाने आम्हा उलगडली अवघड कोडी
विज्ञानाची जोड देऊन वाढवली अध्यात्माची गोडी
तुमच्या रूपाने ईश्वरच आम्हासमोर झालाहो साकार ।।५।।
तव चरणांवर नमवितो आम्ही............

सौ. वृषाली रज्जाक शेख
नाशिक मोबा. ९८२२२४६३५५

ता.क.: त्यांच्या यजमानांनी स्वामीजींची पुस्तके वाचून दाखवल्यावर प्रज्ञाचक्षू वृषालीताईंना स्वामीजींचे झालेले दर्शन, उघड्या डोळ्यांनी दिसते त्यापेक्षा अधिक उत्कटतेने त्यांनी मांडले आहे.

६. नमन स्वामीजी

परमात्म्याने निर्मीलेल्या पवित्र भूमातेत
जन्मले एक परम तेजस्वी रत्न
पुण्याई थोरांची त्यांच्या पाठी
जन हितासाठी केले निस्वार्थ प्रयत्न
स्वार्थाचा लवलेश नसे
चढत गेले परमार्थाची एक एक पायरी
मी, माझे सर्व अर्पिले गुरु चरणी
माँ भगवतीचे कृपाछत्र असे यांच्या शिरी
सर्व संग परित्यागाची झाली पितृआज्ञा
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु ची शिरोधार्य प्रतिज्ञा
विखुरलेल्या प्रिय आत्मन साठी
स्तोत्र मंत्राचे विज्ञान साऱ्या जगतासाठी
तारीले अनेकांना, आशिष दिला
नांदा सौख्यभरे अन धरा परमार्थाला
नंतर शोधा, वदले, साधनापथावर चालताना चुकते कोठे ?
प्रश्न तुमचा उत्तर आमचे चार भागात उत्तर त्याचे भेटे
दयेने सांगीतले सर्वांना हे तो प्रचितीचे बोलणे
प्रेमाचे डोही अध्यात्म तरंग उठता तेथे काय उणे
न करता अध्यात्म, परमार्थ, पहा काय होईजे
लाभता सत्संग सर्व सुखासी पात्र होईजे
महत प्रेमाने कथिले सर्वांना
रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग येतो पहाना
न व्हावे निराश कधीही भेटे परमार्थाचे फळ
तूज मोकलील ऐसे नाही इतुक्या जीवांचा करितो सांभाळ
परम सौभाग्याने लाभले
स्वामीजी आपणास ज्ञानाचे देवेंद्र
नत मस्तक होऊन पाहू त्यांचे
ओंजळीतील चंद्र ओंजळीतील चंद्र

सौ. सुमंगला नं. सलगरकर, औरंगाबाद.

७. स्वामीजी का अपरिग्रह

– लक्ष्मण गडोदिया, सुरत

हमारा पूरा परिवार पू. स्वामीजी से पिछले सात वर्षोंसे जुडा है । इस अवधिमें आश्रम पर विविध कार्यक्रम हुए, इन कार्यक्रमो/ उत्सवो पर भोजन प्रसादी रहती है । मैने हमेशा देखा है, स्वामीजी सभीको भोजन प्रसादी देकर ही सबसे अंत में स्वयं भोजन लेते है । यदि एक भी व्यक्ति शेष रहता है तो उसका भोजन होने के बाद ही स्वामीजी भोजन ग्रहण करते है । जिस प्रकार घर मे मां, सभी बडे-छोटों को भोजन करा देती है, वही मातृत्व रुप हमने स्वामीजी में देखा है। स्वामीजी सहसा कहते है की अपने इष्ट की सगुण उपासना करनी चाहिए। साधना करते करते अपने इष्ट देवी-देवता के गुण हमारे में प्रकट होने चाहिऐ। स्वामीजी माँ भगवती के उपासक है। स्वामीजी का मातृवत्सलरुप हमे तब भी देखनेको मिलता है, जब छोटे बालक अपनी माँ की गोद छोडकर स्वामीजी की गोद मे बैठ जाते है तब अन्य लोगों की बात तो छोडो उसकी माँ उसे गोद मे वापस लेना चाहे तो भी बालक स्वामीजी की गोद छोडकर नही जाता है । जब स्वामीजी स्वयं उसे माँ को देते है तभी बालक माँ की गोद में जाता है । पू. स्वामीजी सगुण उपासना की बात कहते है, वह हमे उनके जीवन में प्रत्यक्ष दिखती है ।

एक बार स्वामीजी अमरावती (महाराष्ट्र) में एकवीरा देवी के मंदीर में माँ के दर्शन हेतु पधारे थे। शांतीसे खडे थे। पुजारीकी नजर जैसे ही स्वामीजी कें उपर पडी उन्होनें कुछ क्षणोंके लिये स्वामीजीको अपलख दृष्टीसे निहारते रहे। पता नही उनको क्या और कैसी प्रेरणा हुई उन्होने स्वामीजीं को मंदीरके गर्भगृह में पाचारण किया सुहागन महिलाओंकी भाती स्वामीजीं का कुंकुम तिलक करके गोद भराई की। बाहर खडे दर्शनार्थी स्तब्ध हो के देखते रह गये।

बात छोटीसी है, परंतु दिलको छू जाती है । एक दिन में परिवार के साथ आश्रम पर उपस्थित था । मुझे दवा के लिए कुष्मांडी (गुडहल) के फूलों की जरुरत थी । संजोग से आश्रमके मंदिर में माँ के चरणों में कुछ पुष्प चढाये हुए थे । स्वामीजी को जब पता चला कि मुझे ये पुष्प चाहिऐ तो उन्होने तुरंत वो सभी पुष्प मुझे दे दिये । उसके अगले दिन ही स्वामीजी गोवा प्रवास पर गए । मेरा बडा सौभाग्य है स्वामीजी का रेल द्वारा प्रवास अक्सर सूरत से व सूरत को रहता है । ३-४ दिन के बाद गोवा से वापसी के समय सूरत होकर उन्हे आश्रम जाना था । जैसे हि स्वामीजी सूरत हमारे घर पधारे उन्होने मुझे एक बॅग पकडाया और कहा ये लो इनकी तुम्हे जरुरत थी । बॅग खोलकर देखा तो उसमे गुडहल के बहुत सारे पुष्प थे । गुरु व भगवान कि स्मृती में मुझे पुष्प की जरुरत है यह बात रही और गोवा जैसे दूर स्थान से मेरे लिए पुष्प लेकर आये, यह देखकर मेरी आंखे नम हो गई ।

स्वामीजी के संपर्क में आने के बाद करीब करीब महिने मे एक या दो बार दर्शन व सत्संग के लिए आश्रम जाना होता है । बात सन २०१५ की है । जब मैं अपने मित्रों के साथ बडोदा से योग शिबीर पूरा करके सूरत लौट रहा था बीच रास्ते में आश्रम है । स्वामीजी के पास बैठकर सत्संग होगा इस भावसे आश्रम पहुचे । मई का महिना था, दोपहर गरमी का समय था सभ्यता के नाते व हम गृहस्थ होने के नाते स्वभाव ही है कि जहा जाये साथ में कुछ ना कुछ लेकर जाना। उस दिन गरमी की दोपहर मे संयोग से कुछ भी फल या वस्तू आश्रम ले जाने के लिए नही मिली। यद्यपि स्वामीजी किसी भी प्रकार की अपेक्षा नही करते है,हम जो भी ले जाते है मान रखने के लिए उसमे से थोडा सा रखकर बाकी सब वापस कर देते है । आश्रम पर पू. स्वामीजी के साथ सत्संग हुआ, अब

लौटना है, लेकीन मेरे मन मे ग्लानी थी की मैं आश्रम खाली हाथ आया व कुछ भी भेट नहीं कर पाऊंगा । अचानक स्मरण होता है कि योग शिबीर केण्टीनमें चाय के मसाले का खास ब्राण्ड मुझे पसन्द आया था उसके २ छोटे-छोटे पैकेट जिनकी किमत २-४ रुपये होगी वो मेरे पास थे। हिम्मत करके (क्योंकी बहुत छोटी सी वस्तु थी) स्वामीजी को पुछा तो उन्होने सहज रुप से उसे स्वीकार किया । कहते है ना कि भगवान व गुरु भाव के भूखे होते है न कि वस्तू के । इस घटनाके पीछे माँ भगवती की लीला थी, यह ना केवल नियम मर्यादा के कारण उसके एक भाग की चर्चा कि गई है। ऐसे कुछ उदाहरण है जब समाज के धनाढ्य लोग धन भेंट कर स्वामीजी से अपने सांसारिक हितों के लिए मार्गदर्शन चाहते है । लेकीन कभी भी स्वामीजी ने ऐसे स्वार्थी लागों को महत्त्व नही दिया । स्वामीजी कहते है स्वार्थी बनो अर्थात स्वयं का अर्थ याने मै कौन? यह जानने के लिए अग्रसर हो, इस रुप में स्वार्थी बनो ।

मुंबईसे एक दिक्षीत परीवार उस समय आश्रमपर आया था। सुबह की चाय बनाते समय दिक्षीत कन्याने स्वामींजीसे पुछा चाय में डालने का मसाला है? स्वामीजी ने कहा नही। इतनी छोटीसी बात लेकिन माँ भगवती ने मुझे माध्यम बनाकर यह वस्तु आश्रमपर पहुंचाई।

आप संन्यासी है, स्वाभाविक है, अर्घ्य उपार्जन करेगे नही, परन्तु श्रद्धालुओ के द्वारा सेवा व समर्पण भाव से भेंट स्वरुप स्वामीजी को आश्रम में जो भी धनराशि मिलती है उसमे से स्वामीजी आश्रम कि आवश्यकताओं को पूरा करने के बाद शेष राशि को सामाजिक कार्य जैसे गरीब आदिवासी कि दवा चिकित्सा, पढाई-शिक्षा व कन्या विवाह आदि में लगा देते है। पूज्य स्वामीजी का नियम है प्रती वर्ष अश्विन नवरात्री के पूर्व जो भी आश्रम पर शेष है उसे अन्य सामाजिक कार्यो में खर्च करके balance sheet शून्य करना। सभी जानते है, हम सभी क्या करते है कॅरी फॉरवर्ड अर्थात वर्षभर धन इकठ्ठा करके उसमें से परिवार कि आवश्यकताओं को पूरा करके शेष राशि को हम अगले वर्ष बचत के रुप में रखते है याने कॅरी फारवर्ड करते है। स्वामीजी के जीवन व्यवहार से हमें बहुत कुछ सीखनेको मिलता है।

परम पुज्य स्वामी श्री सवितानन्द जी

स्वामीजी अर्थात्	साक्षात माँ का स्वरुप
स्वामीजी अर्थात्	एक कुशल प्रबन्धक
स्वामीजी अर्थात्	पर्यावरण संवर्धक
स्वामीजी अर्थात्	समय पालन
स्वामीजी अर्थात्	अपरिग्रही
स्वामीजी अर्थात्	मीतव्यय
स्वामीजी अर्थात्	एक कुशल वक्ता
स्वामीजी अर्थात्	मंत्र ज्ञाता- दूर द्रष्टा
स्वामीजी अर्थात्	भवसागर पार करने की नौका

८. हे यादव हे सखेती

– अंजली शरद सोनावणे

मराठीत एक प्रसिध्द भावगीत आहे ज्याची ओळ आहे 'अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहाणी', माझ्या दुर्दैवाने माझ्या आयुष्यात तसे घडले. वयाच्या ५५ व्या वर्षी वैधव्य आले. भारतीय संस्कृतीत व पाश्चात्य संस्कृतीत एक महत्त्वाचा फरक येथे लक्षात येतो. तेथे या वयातच काय ७५ व्या वयात पण पुन्हा लग्ने होतात. मुले मोठी झालेली असतात. अर्ध आयुष्य संपलेलं असते आणि मग अशा स्त्रियांनी धार्मिक-तपस्वी-संयमी जीवन जगावे अशी समाजाची, घर परिवाराची, सर्वांची अपेक्षा असते.

माझ्या सुदैवाने लहानपणापासूनच हे धार्मिक संस्कार माझ्या घरात असल्याने माझ्यावर पण सहज घडले होते. अमळनेरची संत सखारामांची गादी खान्देशचे (धुळे व जळगांव जिल्हा) श्रद्धा स्थान. त्या गादीवर परंपरेने जे कोणी बसतील त्यांना पण सखाराम महाराज म्हणतात आणि माझ्या वडीलांकडे वर्षातून एक दिवस सखाराम महाराज मुक्कामाला असायचे. स्वाभाविकच अशा वातावरणात वाढल्याने मला माझे जीवन सहजच साधन, भजन, जप, व्रत, उपासनेकडे वळवता आल्याने मी आतून बरीचशी शांतच होते. तशातच सखाराम महाराजांकडून दीक्षा पण घेतली. परंतु त्यांच्या मठाच्या अनेक वर्षाच्या परंपरेप्रमाणे वर्षभरातल्या अमूकच दिवस ते अमळनेरला असतात. बाकी फिरस्ती. अमळनेरला पण मठाच्या परंपरेने एक आगळी वेगळीच व्यवस्था असल्याने मी गुरु करुनही प्रत्यक्ष गुरुसेवेचा लाभ मला कधीच मिळाला नाही. ती एक हळहळ, एक टोचणी मनांत असायची. माझ्या मोठ्या दोन्ही भावांबरोबर स्वामीजी माझ्या घरी दोन-तीनदा आध्यात्मिक चर्चेसाठी येऊन गेले होते. त्यावेळी माझ्या मनात एवढेच की आपल्या गावचेच नाही तर आपल्या दूरच्या का होईना नात्यातले, एकाच गल्लीतले, ते माध्यमिक शाळेत असताना मी प्राथमिक शाळेत होते, तेव्हा ते अनेकदा आमच्या घरी येत होते, ते आता संन्यासी झाले. बस एवढीच भावना. त्या काळात त्यांचा अधिकार मला काय कळणार! माझी स्थिती तर गीतेत अर्जुन म्हणतो तशी हे कृष्ण हे यादव हे सखेति परंतु त्यानंतर वर्ष दोन वर्षातच एक विलक्षण घटना घडली.

बेटावदला माझ्या भाच्याच्या घरी काही विशेष कार्यक्रमानिमित्त सखाराम महाराज व स्वामीजी दोघेही योगायोगाने उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यावर सखाराम महाराज जायला निघाले. स्वामीजी रात्री मुक्कामाला थांबणार होते, म्हणून आम्ही सर्वजण सखाराम महाराजांना निरोप द्यायला दारापर्यंत गेलो. बाहेर गावातील बरीच माणसे पण रस्त्यावर महाराजांच्या दर्शनासाठी वाट पहात उभी होती. स्वामीजी पण महाराजांशी बोलत बोलत आले आणि सखाराम महाराज क्षणभर थांबले. त्यांच्या सेवकाला खूण करुन बोलवले. कानांत काही तरी सांगितले त्याने त्यांच्या बटव्यातून काही रक्कम काढली आणि सखाराम महाराजांच्या हातावर ठेवली. महाराज ते पैसे घेऊन मागे वळले. स्वामीजी जवळ आले. त्यांच्या चरणांशी पैसे ठेवून हात जोडून शिर नमवून वंदन केले. आम्ही सर्वजण व रस्त्यावर उभी असलेली बेटावदची अनेक श्रध्दाळू माणसे आश्चर्याने पहात राहिलो. कारण सखाराम महाराज सर्वांचे श्रध्दास्थान. स्वामीजी तर गावचे. त्यांचा एवढा अधिकार की सखाराम महाराजांनी हात जोडून, शिर नमवून त्यांना वंदन करावे, दक्षिणा ठेवावी म्हणजे आपण स्वामीजींना ओळखलेच नाही. त्याच क्षणी माझा भाव बदलला आणि माझ्या मनात येऊ लागले स्वामीजींची सेवा करायला मिळेल का?

माझा भाग्योदय झाला. स्वामीजींचाच फोन आला आणि म्हणाले, ''अंजू, आश्रमावर ताईंची तब्येत ठिक नाही आणि आम्हाला प्रवचनांसाठी बाहेरगांवी जायचे आहे. तू आश्रमावर सेवा करायला येऊ शकशील का?'' पडत्या फळाची आज्ञा. मी लागलीच आश्रमावर पोहचले आणि त्यानंतर माझ्या सुदैवाने वर्षातून दोन-तीनदा तरी आश्रमांवर जाऊन राहण्याचा, माँ भगवतीची सेवा करण्याचा, स्वामीजी आश्रमावर असतात तेव्हा त्यांची सेवा करण्याची संधी मिळते. हे माझे परमभाग्य !

९. आश्रम अनुभूती

रवींद्र जोशी

ज्येष्ठ कृ. ८ कालाष्टमी

२३ जून २०११ नागपूर.

पूरमपूजनीय सरसंघचालक

मा. श्री. मोहनजी भागवत

सा. नमस्कार!

आपल्याशी बोलणे झाल्याप्रमाणे प.पू. स्वामी सवितानंदांच्या दर्शनाचा आनंद घेवून येथे सुखरूप पोचलो. प.पू. स्वामीजींचे गुरू श्री. शक्तिबालक, छपरा, बिहारचे आहेत.

निर्जला एकादशी व ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशी (हिंदु साम्राज्य दिवस) या पावन पर्वावर ''सूर्यकन्या साधना कुटीर'' येथील वास्तव्याची स्मृती आम्हा जोशी कुटुंबियांना चिरकाळ स्फूर्तीप्रद राहील. तापी नदीच्या तीरावर, तरसाडा गावी, जि. सूरत, प. पू. रंग अवधूत महाराज मंदिर परिसरातच स्वामीजींचे निवासस्थान आहे. त्यांच्या ८२ वर्षांच्या गुरूभगिनी वंदनीय साध्वी दयामयी सोबत असतात.

आमच्या वास्तव्यातील प. पू. स्वामीजींच्या सान्निध्यातील अमृतबिंदु आपल्यापर्यंत पोहोचवीत आहे.

महर्षी व्यासांच्या काळात व माता कुंतीच्या काळातील खुलेपणा व दडवून/झाकून ठेवणे याविषयी बोलणे सुरू असताना समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने काय चांगले असे मी विचारले, त्यावेळी प.पू. स्वामीजींनी एक दृष्टांत सांगितला.

एका साधूच्या दर्शनाला बरीच मंडळी येवू लागली. थोडे दिवसात तेथे धर्मशाळा उभारण्यात आली. त्याच्या व्यवस्थापनासाठी २-३ ब्रह्मचाऱ्यांची योजना झाली. भक्त मंडळी येत असत. धर्मशाळेत रहात असत. एक दिवस एका भक्ताची सोन्याची साखळी चोरीला गेली. ही बाब ब्रह्मचाऱ्यांच्या अंगलट येऊ नये म्हणून नियम करण्यात आला की, त्यांनी भक्तांची राहण्याची सोय तर करावी परंतु जास्त जवळीक ठेवू नये. काही दिवसांनी धर्मशाळेच्या आवारात एक म्हातारी पडली. ती मदतीसाठी हाक मारू लागली. परंतु ब्रह्मचाऱ्यांनी तिला साहाय्य केले नाही. या प्रसंगाचा बोध घेवून सांगण्यात आले की, अडीअडचणीचे वेळी मदत करावी. काही दिवसांनी आश्रमाशेजारच्या नदीला पाणी जास्त असताना एका युवतीला नदी पार करून जायचे होते. तिला नदी पार करताना अडचण येत असल्याचे ब्रह्मचाऱ्याच्या लक्षात आले. तो तात्काळ मदतीसाठी धावला. पुःनश्च आश्रमात चर्चा सुरू झाली. ब्रह्मचारी असून युवतीला नदी पार करायला मदत करतो? हा दृष्टांत सांगून प. पू. स्वामीजी म्हणाले, मनुष्यजीवन खूप व्यामिश्र आहे. त्यासाठी एक नियम करून चालत नाही. विवेक जागृती आवश्यक असते. विवेकाने काम केले पाहिजे.

प.पू. स्वामीजींनी प्रश्न विचारला, ''विहिरीचे पाणी काढताना जोपर्यंत बादली पाण्यात असते तोपर्यंत तिचा भार वाटत नाही. बादलीचा दोर ओढून बादली पाण्याचे वर आली की भार वाटतो, असे कां?'' ते म्हणाले, ''जोपर्यंत बादली पाण्यात असते तोपर्यंत ते पाणी सर्वांसाठी असते. मी बादली वर ओढली की माझ्यासाठी पाणी घेतो, त्यामुळे भार वाढतो.''

* समाजात विविध कथा सुरू असताना दिसतात परंतु सामाजिक परिवर्तन दिसत नाही असा विषय निघाल्यावर ते म्हणाले, ''भोवऱ्याला गती असते परंतु प्रगती नसते.'' कार्याचा आत्मा गवसला नाही तर असे होते.
* धर्मांतरणाविषयी बोलताना त्यांनी म्हटले, ''माझ्या धर्मातील व्यक्तीला धर्म बदलण्याची इच्छा का होते'', ते प्रथम समजून घेतले पाहिजे व त्यावर उपाय केला पाहिजे.
* जगन्नाथपुरीच्या मंदिरात भोजनालयाच्या परिसरातून युरोपीयन दंपती चालत गेल्यामुळे तेथील अन्न टाकून देण्यात आले या बातमीने प.पू. स्वामीजींना तीव्र वेदना झाल्या.
* संस्थांचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये सुसंवाद राहण्यासाठी 'सहनशक्ती व समजशक्ती' हे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.
* हत्तीचे स्वरूप जाणून घेण्यासाठी ६ अंधांच्या प्रयत्नाचा दृष्टांत सर्वपरिचित आहे. त्यावर प. पू. स्वामीजी म्हणाले, ते सहा जण (Specialist) विशेषज्ञ होते.
* न्याय या विषयावर बोलताना प.पू. स्वामीजी म्हणाले, एखाद्या गुंड व्यक्तीने मुलीशी दुर्व्यवहार केला, गुन्हा सिद्ध झाला तर कायद्यानुसार जी शिक्षा असेल ती द्यावी परंतु तोच गुन्हा एखाद्या न्यायाधीशाने, मंत्र्याने केला तर त्यांना कोणती शिक्षा द्यावी? त्यांना सामान्य कायद्यापेक्षा अधिक कठोर शिक्षा दिली पाहिजे.
* प.पू. स्वामीजींनी ईश्वराच्या दोन प्रश्नपत्रिकांचा दिलेला दृष्टांत खूप आवडला.
  १) ईश्वर खूप सुख देईल त्यावेळी माझे स्मरण ठेवतो काय हे तो पाहतो.
  २) ईश्वर खूप दु:ख देईल त्यावेळी तो पाहतो की, हा तुटतो का? याची श्रद्धा ढळते का?

१०. तेथ अवचटे पडे पीयुख

– ज्ञानेश्वर राजकुंटवार, पुणे

पाच वर्षांपूर्वी काहीही न ठरवता अगदी योगायोगाने व पूर्व जन्मीच्या पुण्याईने स्वामीजींच्या दर्शन व प्रवचनाचा किंवा त्यांच्या भाषेत भेटीचा, योग आला. माहूरला जाताना स्वामीजी अरणी येथे एक दिवस मुक्कामास आहेत तिथेच त्यांना भेटावयास यावे असे माझे साडू डॉ. चिंतावार व सौ. ज्योस्नाताई यांनी आम्हा उभयतास सुचविले. तो पर्यंत स्वामी सवितानंद कोण याची आम्हास कल्पनाही नव्हती. व्यक्तिगत प्रश्नांची उत्तरे देवू शकणारे कोणी महात्मा असावेत हा सर्व साधारण लोकांप्रमाणेच माझाही समज होता जो चुकीचा होता हे लवकरच कळून चुकले.

आर्त–जिज्ञासू–अर्थार्थी यातील पहिल्या प्रकारच्या भक्ताप्रमाणे काही प्रापंचिक समस्येचे निराकरण करून घेणे एवढ्या माफक उद्देशानेच भेटायचे होते. तसेच आम्हा उभयतांच्या घरचे वातावरणही अध्यात्मीक स्वरूपाचे असल्यामुळे सत्पुरुषांच्या सहवासाची आवडही होतीच.

या पहिल्या भेटीतच जे काही अनुभवले ते पण विलक्षणच होते. **'ना तरी जांभया पसरे मुख। तेथ अवचटे पडे पीयुख'** या माऊलीच्या उक्तीचा पहिल्यांदाच प्रत्यय आला. ज्या कारणासाठी भेट घेणे होते तेच बाजूला राहीले आणि अचानक धनलाभासारखा आनंद झाला. इतकी वर्षे पुण्यात असूनही स्वामीजींच्या भेटीचा योग इतक्या दूरवर व इतक्या उशीरा यावा यातही काही संकेत असावा असे वाटले.

पुढे पुण्यात त्यांच्या सहवासाचा खूप वेळा योग आला आणि प्रत्येक वेळेस स्वामी सवितानंद या अद्‌भुत रसायनाचे वेगवेगळे पदर दिसत राहीले. त्यांच्या अध्यात्मीक साधनेविषयी एक शब्दही लिहीण्याची माझी पात्रता नाही. पण लेखक म्हणून त्यांनी लिहीलेली ग्रंथसंपदा नुसती चाळली तरी त्यांच्या प्रतिभेच्या आवाक्याने आपण थक्क होतो. कमीत कमी शब्दात अतिशय मुद्देसूद विचार मांडण्याची त्यांची शैली केवळ अद्‌भुत म्हणावी अशीच आहे. 'हे तो प्रचितीचे बोलणे' या पुस्तकात ते वैराग्याची व्याख्या करताना लिहीतात, 'प्राप्त व प्राप्य वस्तुंबद्दल आकर्षण नसणे एवढ्यालाच वैराग्य म्हणत नाहीत तर अप्राप्य व अप्राप्त वस्तुंबद्दलचे आकर्षण न वाटणे वैराग्य आहे.' वैराग्याची इतकी सुटसुटीत व परिपूर्ण व्याख्या पाहीली की माऊलींच्या ज्ञानेश्वरीतील 'दान' या शब्दाची व्याख्या आठवते. आणि

दान जया द्यावे । तयाते ऐसेया पाहावे। जया घेतले नुमचवे । कायसेन ही ।।

जणू काही स्वामीजींच्या मुखातून माऊलीच बोलते आहे इतके खोलवर स्वामीजींचे लेखन हृदयात कोरले जाते.

एका गोष्टीचा इथे उल्लेख करावासा वाटतो. लहानपणापासूनच ज्ञानेश्वरी व हरिपाठ यांचे वाचन वारसाहक्कानेच मला मिळाले होते. आई–वडील दोघेही वारकरी असल्याने दरवर्षी कार्तिक महिन्याची पंढरपूर ते आळंदी अशी महिनाभर वारी असायची. त्यामुळे ज्ञानेश्वरीचे वाचन व्हायचे ते केवळ पारायण म्हणूनच. स्वामीजींच्या अगदी थोड्याश्या सहवासाचीच जादू अशी झाली की त्यांनी न सांगताही माझे ज्ञानेश्वरीचे नियमित वाचन सुरू झाले आणि हळूहळू त्यातील शब्दमाधुर्यात हरवून जाणे नित्याचे झाले.

शाश्वततेच्या रस्त्यावर हलकेच बोट धरून आपल्याला नेणारे आणि केवळ आपल्या अस्तित्वाने नको असलेले बाजूला सारून चैतन्याची संगत मनाला जाणवून देणारे स्वामी सवितानंद या नांवाचे असीम गुरूतत्व शब्दांत सांगता येणार नाही.

गीतेवरील 'ओंजळीतील चंद्र' सारखेच त्यांनी ज्ञानेश्वरीवर लिहावे ही माँ जगदंबा चरणी प्रार्थना.

११. संस्काराचे परिणाम

– एक पथिक

(स्वामीजींना आलेले एक पत्र)

१/१०/२०१३

आदरणीय स्वामीजी,

शि.सा. प्रणाम,

गुरूजी, मी तुम्हाला हे पत्र जेलमधून (येरवडा मध्यवर्ती करागृह, पुणे) लिहीत आहे आणि अगोदरच सांगत आहे मी कधी सुटणार? हे विचारायला मी हे पत्र लिहीत नाही आहे. कारण जी हे माझ्या वर्तमान कर्माचे, पूर्वजन्माच्या कर्माचे फळ आणि प्रारब्ध भोग या गोष्टींवर अवलंबून आहे हे तुमची पुस्तके वाचून मला उमगले. (प्रसाद प्रकाशन प्रकाशित)

गुरूजी, तुम्ही फक्त तुमचा एक फोटो मला जेलमध्ये पाठवावा किंवा माझ्या घरी पाठवावा एवढीच माझी इच्छा आहे. (तुमचा फोटो घरी पाठविला म्हणजे माझी पत्नी एक प्रत घरी व एक मला जेलमध्ये पाठवेल.) मी पत्राच्या शेवटी माझ्या जेलचा व घरचा पत्ता लिहिणार आहे आणि परमेश्वराची कृपा झाली व ग्रह, नक्षत्र व शुभ मुहूर्त आला, तर स्वामीजी तुमचेपण दर्शन घ्यायला मी नक्की येईन. तुमच्या प्रसाद माध्यमातून वाचलेल्या पुस्तकाने माझ्या मनात व जीवनात इतका बदल होऊ शकतो तर तुमच्या दर्शनाने किती फरक पडेल, हे मी स्वत:च जाणून आहे. हा एक प्रकारचा माझा स्वार्थच आहे; पण चांगला स्वार्थ आहे. तुमच्या पुस्तकात मी वाचले आहे, ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मनाची एक गोष्ट चांगली आहे याला ज्याची गोडी लागते त्याच्याकडे ते धाव घेते तशीच अवस्था माझ्या मनाची झाली आहे.

ईश्वरकृपेने तुमचे पुस्तक व विचार माझ्या वाचनात आले ही सर्व ईश्वरलीलाच आहे. त्याबद्दल पण थोडे लिहावे असे मला वाटते आहे म्हणून लिहितो, 'गुरूजी, मी नागपूरचा' रहिवाशी आहे व नागपूरलाच राहतो. मला नागपूर जेलमधून पुणे येथे (येरवडा जेल) पाठविले आहे. माझ्यावर १/६/२०१३ ला M.P.D.A. (स्थानबद्ध) पोलीसाच्या भाषेत 'झोपडपट्टी दादा' हे कलम लावून (१ वर्षासाठी) जेलमध्ये पाठविले आहे. सहा दिवस मी नागपूर जेलला होतो. तिथून स्थानांतर करून मला पुण्याला पाठविले ६/६/२०१३ ला. इथे माझा पाचवा महिना सुरू आहे.

तसा मी अगोदरपासूनच पूजा-पाठ वगैरे करत होतो, पण तितका नाही जितका आता करत आहे आणि पूर्वीही पूजा-पाठ, भगवंताकडे कसा वळलो ते पण पत्रात नंतर लिहीन. आता फक्त हे सांगतो की, गुरूजी, तुमचे पुस्तक माझ्या वाचनात कसे आले. मी जेव्हा पुण्याला जेल मध्ये होतो. तेव्हा खूपच उदास, चिंतेत व परेशान होतो. नवीन जेल, नवीन लोक, नवीन शहर, कोणीच ओळखीचे नाही. उलट घरची चिंता, पत्नी, मुले त्यामुळे खूपच मानसिक ताण, अस्वस्थ वाटायचे. सुरूवातीला एक महिना खूपच दयनीय अवस्थेत गेला. अशाच एके दिवशी परेशानीमध्ये माझ्या खोलीत (जेलच्या) मला पूर्वीचे कोणी तरी आणलेले छोट पुस्तक दोन रूपयाचे 'अमृतसंदेश' दिसले. ते मी वाचले. त्यातील गुरूजी श्री रामकृष्ण परमहंस व माताजी

श्रीसारदादेवी यांचे उपदेश वाचून मन खूप शांत व स्थिर झाले. जेव्हाही मन दु:खी झाले, अस्वस्थ झाले की, मी त्यांचे उपदेश सतत वाचतच असे त्यामुळे दु:ख सहन करण्याची शक्ती मिळून मन शांत होऊ लागले.

तुमची 'स्तोत्र मंत्राचे विज्ञान' व 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू' ही दोन तुमची पुस्तके वाचनात आली. ती वाचून ईश्वर व भारतीय संस्कार, महान ऋषिमुनींनी दिलेले ज्ञान व संस्कृती या सर्व गोष्टींचे महत्व कळले. त्याचबरोबर सर्व बाबतीतील शास्त्र-संगत विज्ञान, तुम्ही सांगितलेल्या बारीक गोष्टी आणि गुरूजी तुमचे महान विचार यामुळे मी प्रभावित होऊन माझ्या जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोनच बदलला. माझ्या मनाची चिंता व अस्वस्थता पूर्वीपेक्षा आणखीनच शांत झाली. तुमचे पुस्तक वाचून झाल्यावर जेलमध्ये मला एका जेलमधून सुटणाऱ्या व्यक्तीमार्फत 'भगवद् गीता जशी आहे तशी' स्वामी प्रभुपाद यांनी लिहिलेली मिळाली. मी ती शांत चित्ताने वाचली. मला आणखीनच शांत वाटायला लागले. दु:खाची तीव्रता कमी होऊ लागली. घर, पत्नी, मुलाच्या आठवणीने अस्वस्थ असलेल्या मनाला धीर येऊ लागला. कर्म, कर्मफल, आत्मा, मन, बुद्धी, इंद्रिये, सत्व, रज, तमोगुण व कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग याबद्दल भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला दिलेले उपदेश कळले. (काही प्रमाणात)

मनातील द्वेष, राग, लोभ कमी होऊ लागला. असे वाटले या सर्व सुख-दु:खाला संसाराला सोडून संन्यास घ्यावा म्हणजे दु:खाचा प्रश्नच येणार नाही. पण मग लक्षात आले भगवद्गीतेत सांगितले आहे. ''ईश्वरानेच आपल्याला या मायारूपी संसारात पाठविले आहे. तेव्हा ईश्वराची लीला समजून संसारात राहून भक्तीभावाने त्याची पूजा केली पाहिजे. सदैव त्याचे नाव आपल्या मुखात राहिले पाहिजे आणि आपल्या हातून इतरांची जितकी सेवा करता येईल तितकी सेवा केली पाहिजे आणि आपल्या सोबत जे काही घडत आहे, चांगले किंवा वाईट ते सहन करीत राहिले पाहिजे.'' हे सर्व मी माझ्या पत्नीला पण लिहून (एकदा) पाठविले होते. त्यावर ती पत्रात म्हणत होती, ''साधू, संन्याशी बनणे खूप मोठी गोष्ट नाही; पण संकटांना, दु:खांना घाबरून साधू, संन्याशी बनणे बरोबर नाही. त्यांचा देवांना, ईश्वराला समोर ठेवून सामना केला पाहिजे.

त्यानंतर माझ्या पत्नीने मला 'रामकृष्ण परमहंस यांचे संक्षिप्त जीवनचरित्र व मार्गदर्शन' हे पुस्तक पाठविले. 'ज्ञानेश्वर माऊली' पण पाठविली. पण तुम्ही सांगितल्याप्रमाणे त्यामध्ये 'ओव्या' नव्हत्या. ती पुस्तके वाचून मन प्रसन्न व शांत राहायला लागले. तरी कधी कधी खूप राग व अशांत वाटायचे तेव्हा माझ्या लक्षात आले पौर्णिमा व अमावस्या या वेळी चंद्राच्या प्रकाशाचा परिणाम जसा पाण्यावर होतो तसाच आपल्या शरीरावर पण होतो. त्यामुळे त्या दिवशी शांत व चुप राहण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर माझ्या प्रशांत मिश्रा या मित्राने मला 'शिव-पुराण', 'गीता प्रेस, गोरखपूर, 'दिव्यस्पर्शी' लेखक धनंजय देशपांडे व 'प्रश्न आमचा उत्तर तुमचे भाग १ व २' ही स्वामीजी तुमची दोन पुस्तके पाठविली. त्यातील 'शिव-पुराण' मी वाचले. वाचायला थोडे जास्त दिवस लागले. त्यातील पुराणकथा कळल्या पण खूप काही गोष्टी मुळीच समजल्या नाहीत. त्याचवेळेस माझ्या पत्नीने 'सर्व सुखासी पात्र होईजे', 'सोळा संस्कार', 'गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णू' 'हे तो प्रचीतीचे बोलणे' देखील पाठवली. या पुस्तकांचे वाचन आज पासून सुरू करणार आहे आणि तुम्हाला पत्र लिहायचा व मार्गदर्शन घेण्याचा मी मोह आवरू शकलो नाही. माझ्या लक्षात आले ईश्वराच्या इच्छेशिवाय मी माझ्या मनात येत असलेले काहीच करू शकत नाही. त्यासाठी ईश्वरकृपा व प्रारब्धभोग भोगल्यावरच भक्तीमार्गाने ईश्वरचरणी मुक्ती मिळू शकते. स्वामीजी, 'प्रश्न आमचा उत्तर तुमचे' व 'दिव्यस्पर्शी' ही दोन पुस्तके वाचून व्हायची आहेत. दोन दिवस अगोदर मी माझ्या पत्नीला तुमच्या आश्रमाचा पत्ता व नंबर पत्रात लिहून पाठविला आहे व काही गोष्टी तिला पत्रात विचारल्या आहेत. तिचे पत्र आल्यावर

पुन्हा पत्र लिहायला सुरूवात करीन.

(गुरूजी, उद्या 'दिवाळी' आहे. पण मनावर जास्त ताण नाही. मुलाची, पत्नीची आठवण येत आहे. कारण मी पण एक सर्वसामान्य संसारी पुरुष आहे.)

तुमचा भक्त.

१/१०/२०१३

स्वामीजी, शि.सा. प्रणाम,

गुरूजी, आज आणि काल दोन्ही दिवस दिवाळी आहे; पण गुरूजी खरं सांगतो, जेलमध्ये असतानासुद्धा ही दिवाळी खूप प्रसन्नतेने गेली. मन खूप शांत व उत्साही होते. त्याचे कारणही तसेच होते कारण तुमची पुस्तके वाचून मनात असा विचार आला की यापूर्वी दिवाळसण गेले. त्या दिवाळी सणापेक्षा ही दिवाळी वेगळी आहे. यापूर्वीच्या दिवाळी घरच्या परिवारासोबत व मित्रासोबत गेल्या; पण ही दिवाळी परमेश्वर भगवान ईश्वर याच्यासोबत भक्तिभावात गेली. कारण प्रत्येक वेळी मी भगवंताचे नाव व तुमची पुस्तके वाचत होतो. त्यामुळे ही दिवाळी पूर्वीच्या दिवाळीपेक्षा खास झाली. अगदी वेगळ्या अनुभवांची झाली. हा एक वेगळाच अनुभव मला जीवनात आला.

स्वामीजी, तुम्ही लिहिलेले 'हे तो प्रचीतीचे बोलणे' हे पुस्तक पण आज वाचून झाले. 'अन्न तसे मन' याबद्दल खूप काही समजले व सात्त्विक भोजन कसे असते व कशा प्रकारे सात्त्विक असते ते पण कळले. याचा परिणाम व तामसी अन्नाचा परिणाम दोन्ही गोष्टी कळल्या. तसेच नैवेद्य का? व कसे? त्याचे महत्त्व हे पण कळले. 'शरीर एक यज्ञकुंड आहे ईश्वराचे' या गोष्टीचा पूर्ण विश्वास झाला व मी ते आचरणात आणत आहे.

माझ्या जीवनात पुढे काही वेगळे बदल व्हावे म्हणूनच तुमची पुस्तके माझ्या वाचनात आली. पुस्तकातील काही गोष्टींचा मी स्वत: जेलमध्ये अनुभव घेतला म्हणून.

'ईश्वर तू सर्वकर्ता मी फक्त दास'

इतके लिहून आताचे लिहिणे थांबवतो.

तुमचा भक्त.

१२. हमे प्रेम की नैय्या से भवसागर पार उतारो !!

–श्री कालुशंकरजी त्रिपाठी,
मांडल, जि. भिलवाडा, राजस्थान

सवितानंद महाराज ! स्वामी सवितानंद महाराज !

प्रथम बार जब यहा पधारें स्वामी सवितानंद
कुछही क्षणों में आ गया जीवन में आनंद
सुबह शाम दोनो समय कीर्तन की होती मौज
दूर दूर से आ जाती छोटे बच्चों की फौज
तीव्र ध्वनी से हिलते रहते घर और मंदिर के खंबे
मंत्र सभी दोहराते रहते **'उमा भवानी जय जगदम्बे'**
जागृत हो गयी चेतना मन पर चढ गया ताज
चित्त में आकर बस गये **'श्री शक्तिबालक महाराज'**
जगदंबा के भाव में सब हो जाते संयुक्त
तत्क्षण ही हम हो जाते कर्मबंध से मुक्त
जाने कहा पर खो जाते दुनिया के लफडे झपडे
इस का ही ध्यान नही रहता कहा शरीर कहा कपडे
हर क्षण सबको अनुभव होता माँ दुर्गा का प्रेम
और सभी को लग जाता योग प्रेम और क्षेम
महाराष्ट्र से स्वामीजी कैसे पहोचे थे बिहार?
फिर राजस्थान में बह गई उनके प्रेमामृत की धार
हर जाती हर धरम के बंदे करते उनसे अतीव प्यार
बडे बडे राजा महाराजा भी है सेवा में तैयार
हम को है इंतजार स्वामीजी शीघ्र पधारो!
हमे प्रेम की नैय्या से भवसागर पार उतारो !!

जय माँ जय बाबा

१४. योगीया दुर्लभ तो म्या देखिला !!!

स्वामीजींच पहिल्यांदाच दर्शन झालं ते संगमनेरला डॉक्टर ओंकार कोर्टीकर यांच्या घरी. नक्की तारीख आठवत नाही पण २०१३ हे वर्ष होतं. मी संगमनेर महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशीचे तास संपले होते आणि निवांत बसलो होतो. तेवढ्यात डॉक्टर ओंकार कोर्टीकर यांचा फोन आला. सर, माझ्याकडे स्वामी सवितानंद नावाचे एक सत्पुरुष येणार आहेत, दर्शनाला यायला जमेल का? मी लगेच हो म्हणालो आणि बाईकवर डॉक्टरांच्या घरी पोहोचलो. बाहेरचे गेट उघडून आत निघालो, तर खिडकीतून लांब व शुभ्र केस असलेले कुणीतरी कोचावर बसले आहेत असे दिसले. मी मनात म्हणालो, अरे हेच ते स्वामीजी असणार. मी हॉलचे दार उघडून आत गेलो तर तिथे कुणीच नव्हते. अरेच्चा! मी तर पाहिलं होतं मग काय झालं? तेवढ्यात दाराचा आवाज ऐकून डॉक्टर बाहेर आले. म्हणाले, या सर. स्वामीजी आत भोजन करत आहेत तुम्ही बसा. मी विचारात पडलो, आपल्याला दिसलं ते कोण. तेवढ्यात स्वामीजी हात धुवून बाहेर आले. तेच शुभ्र केस, भरदार शुभ्र दाढी, अतिशय प्रसन्न आणि तेजस्वी भारदस्त व्यक्तिमत्त्व आणि या व्यक्तिमत्त्वाला साजेसा गंभीर व शांत आवाज. पाहताक्षणीच आदरभाव वाटला. स्वामीजी कोचावर स्थानापन्न झाल्यावर डॉक्टर ओंकारनी माझी ओळख करुन दिली. हे प्राध्यापक अनंत दिवेकर, संगमनेर महाविद्यालयातील कॉमर्स विभागात अकौंटन्सी विषय शिकवतात.मी नमस्कार केला. उभा राहिलो. स्वामीजींनी माझ्याकडे पाहिलं आणि ते हसत हसत म्हणाले, अहो तुम्ही अकौंटन्सी शिकवता हे ठीक आहे, पण जीवनाच अकाऊंट कळलय का तुम्हाला? त्याच्या त्या मार्मिक प्रश्नाने मी स्तंभित झालो, विचारात पडलो खरच जीवनाचे अकाऊंट कळलंय का? अजून तरी हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. मी त्यांना तुम्ही तर आत जेवण करत होतात, मग बाहेर खिडकीतून कसे दिसलात असा प्रश्न विचारल्यावर त्यांनी फक्त एक स्मितहास्य केले.त्या क्षणापासून मी त्यांचा भक्तच झालो. माझ्या आयुष्यात प्रथमच एका खऱ्याखुऱ्या सिद्ध पुरुषाचे दर्शन झाले. त्यानंतर त्यांनी बसायला सांगितले, समोर बसलो. काही मोजकी भक्त मंडळी दर्शनासाठी येत होती. प्रत्येकजण फळे, नारळ, पेढे, हार, गुच्छ इ. काहीना काही घेऊन येत होते. स्वामीजी त्याला स्पर्श करून कुणा कुणाला तो प्रसाद देत होते. मलाही दोन सफरचंद प्रसाद म्हणून दिली, मला खूप ओशाळून गेल्यासारखे वाटलं. तिथे मी एकटाच रिकाम्या हाताने गेलो होतो. डॉक्टर ओंकारांच्या लक्षात आले. ते म्हणाले मनाला लावून घेऊ नका पुढच्या वेळेस आणा. नंतर मात्र पुन्हा मी ती चूक केली नाही. यानंतर मात्र डॉक्टरांकडे स्वामीजी आल्यावर त्यांच्या दर्शनाशिवाय चैन पडत नाही.

पहिल्या भेटीनंतर मी त्यांच **इतुक्या जीवांचा करितो सांभाळ** हे अप्रतिम पुस्तक वाचले. यातील अनुभव वाचून मी अक्षरशः भारावून गेलो. नंतर त्यांची जवळपास सर्वच पुस्तके मिळवून वाचली. त्यांची सहज सुंदर लेखनशैली आणि आत्मानुभवाचा प्रत्यय ही पुस्तके वाचताना जागोजागी येतो. पुस्तकी ज्ञान व जड भाषेत लिहिलेली अध्यात्माची अनेक पुस्तके आहेत पण वाचकांशी सहज संवाद साधत इतक्या सोप्या भाषेत स्वामीजींनी लिहिलेली ही पुस्तके निश्चितच खूप वैशिष्ट्यपूर्ण आहेत. प्रत्येक पुस्तक आकाराने फार मोठं नाही आणि किंमती पण अगदीच कमी आहेत. पुस्तकांची शीर्षके देखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत उदा. प्रश्न आमचा उत्तर तुमचे, साधना पथावर चालताना चुकते कोठे? इ. स्वामीजींशी बोलणे म्हणजे एक सुखद संवाद असतो.

चपखल उदाहरणे देत, हसत हसत चिमटे काढत, मिश्किलपणे ते बोलत राहतात. आपल्याच मनातल्या प्रश्नांची उत्तरे आपोआप मिळत जातात. मनाच्या चंचलतेविषयी आणि एकाच वेळेस अनेक पुस्तके वाचावयाची वाईट सवय याविषयी मी विचारले, माझी अर्धवट राहिलेली पी एचडी इ. वैयक्तीक शंकावर देखील त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या परम कृपेमुळे माझी पी एचडी २०१५ मध्ये पूर्णत्वास गेली. डॉक्टर ओंकार कोर्टीकर यांच्यासोबत स्वामीजींच्या सूर्यकन्या साधना कुटीर या सुरत जिल्ह्यातील तरसाडा येथील निसर्गरम्य आश्रमास भेट देण्याचे भाग्य लाभले. तापी नदीकाठावरील हा आश्रम विलक्षण शांतता व सकारात्मक अनुभव देणारा आहे. त्यांच्याकडे आदरणीय सरुताई या साधक शिष्य राहतात व तेथील सर्व व्यवस्था पहातात. त्या जेवणही बनवतात. साक्षात स्वामीजींच्या पंगतीला हा प्रसाद घेण्याचे महद् भाग्य मला लाभले.

त्यावेळी स्वामीजींनी एक ह्रदयस्पर्शी प्रसंग सांगितला. आदरणीय सरुताई स्वयंपाक झाल्यावर आश्रमाच्या मागील बाजूस एका ओट्यावर चिमण्यांसाठी भात वगैरे खायला ठेवतात. त्यांनी हे ठेवताच असंख्य चिमण्या चिवचिवाट करत त्या अन्नावर अक्षरशः तुटून पडतात. दोन तीन मिनिटात ते संपूनही जाते. हा रोजचाच कार्यक्रम आहे. एक दिवस सरुताई त्या चिवचिवाट करणाऱ्या चिमण्यांना उद्देशून म्हणाल्या, काय कलकल लावलीत, आयतं खाऊन नुसत्या ढोल्या झालाय, अन्न शोधायचे कष्ट नको, नुसत्या आळशी झाला आहात. त्यांचं बोलणं संपायच्या आत, खाणे अर्धवट सोडून त्या चिमण्या उडून गेल्या, परत येईनात. हाच अनुभव ओळीने दोन तीन दिवस सरुताईंना आला. अन्न ठेवले की चिमण्या यायच्या पण समोर फांद्यांवर गपचूप बसून रहायच्या. खाली उतरायच्याच नाहीत. जणू त्यांनी सत्याग्रह केला होता. दोन तीन दिवस असे झाल्यावर सरुताईंनी स्वामीजींकडे चिमण्या अलीकडे खात नाहीत अशी तक्रार केली. स्वामीजींना काय झालय ते लक्षात आले तरी त्यांनी सरुताईंना विचारले, नक्की काय झाले ते सगळे सांग. सरुताईंनी आपण चिमण्यांना उद्देशून काय बोललो ते सांगितले. स्वामीजी म्हणाले, अरे तो मुका जीव असला तरी त्यांलाही मान-अपमान, भाव-भावना आहेतच. तू त्यांची हात जोडून, मनापासून माफी मागून पुन्हा असे बोलणार नाही असे वचन दे, मग बघ काय होते ते. दुसऱ्या दिवशी सरुताईंनी चिमण्यांना अन्न ठेवून हात जोडून त्या चिमण्यांची मनापासून क्षमा मागितली व आता जेवण करा असा आग्रह केला, तत्क्षणीच सगळ्या चिमण्या चिवचिवाट करत खाली उतरल्या व त्यांनी सगळे अन्न फस्त केले. ज्ञानेश्वर माऊलींनी जे जे भेटे भूत या ओवीत सर्व भूतमात्रात एकच चैतन्य भरुन राहिले आहे हे जे तत्व सांगितले त्याची प्रचिती या घटनेच्या रुपाने सरुताईंना आणून दिली. स्वामीजींचे व्यक्तिमत्त्व शब्दात पकडणे फारच अवघड आहे. मी जन्मभर स्वामीजींच्या ऋणात राहीन. आपण त्यांचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत. आणखी असंख्य वर्ष स्वामीजींचे मार्गदर्शन व सहवास अखंड मिळत राहो ही भगवती चरणी प्रार्थना. माझ्यासारख्या या अध्यात्मीक क्षेत्रात बालवाडीत असलेल्या पामरास स्वामीजीं विषयी लिहिण्याची संधी दिल्याबद्दल संयोजक व संपादकांचे मनापासून आभार आणि धन्यवाद.

स्वामीजी चरणरज ,

अनंत दामोदर दिवेकर, संगमनेर

१५. छत्रछाया

– शनीकुमार राहुलभाई व्यास,
(लालाजी महाराज, मांडवी)

गुरुचरणी वंदन करुन स्वामी श्री सवितानंदांविषयी लिहिण्याचा अल्पसा प्रयत्न करतो. त्यांच्याविषयी मी माझे मत मांडणे हे मी माझे सौभाग्यच समजतो. तसे स्वामीजींना शब्दांच्या छोट्याशा विश्वात सामावून घेणे अशक्यच आहे.

स्वामीजींच्या ठायी भौतिक विषयाचे ज्ञान आणि अध्यात्मविद्या यांचा संगम आहे. शिक्षण आणि साधना यांचा उत्तम समन्वय साधला आहे. त्यामुळे ते आजच्या विज्ञानयुगातील तरुण पिढीला सहज मार्गदर्शन करुन अध्यात्माकडे वळवू शकतात, जी आजच्या काळाची गरज आहे. देश, काल, परिस्थितीप्रमाणे. आजही त्यांचे ज्ञानार्जन सतत चालू आहे. ते डॉक्टरांशी मेडिकल विषयावर, वैद्यांशी आयुर्वेद, ज्योतिषांशी ज्योतिष, शिक्षकांशी शिक्षणक्षेत्र, कर्मकांडी ब्राह्मणांशी कर्मकांडा संदर्भात सहज संवाद साधू शकतात. केवळ अध्यात्मीक क्षेत्रातच नव्हे तर भौतिक-व्यावसायिक क्षेत्रातही. समोरच्या व्यक्तीचे वय, शिक्षण, व्यवसाय, नोकरी काहीही असो गरीब, श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, तरुण, स्त्री-पुरुष कसलाच भेदभाव मनात न आणता त्यांच्या कल्याणासाठी, हितासाठी जे आवश्यक आहे त्याचे योग्य मार्गदर्शन स्वामीजी करतात. जे आजच्या काळात दुर्लभ आहे आणि ते ही कोणाकडून काहीही अपेक्षा न ठेवता.

स्वामीजींच्या मार्गदर्शनानुसार चालणाऱ्यांचे सांसारीक प्रश्न अडीअडचणी-मतभेद, कटूता सहज दूर होऊन सुखी सांसारिक जीवन जगणारे अनेक परीवार मी स्वतः पाहिले आहेत. अध्यात्मीक क्षेत्रात साधना करणाऱ्यांचे तर विचारायलाच नको, साधनेत इतके उत्तम मार्गदर्शन करणारा अधिकारी पुरुष वर्तमान काळात माझ्यातरी पाहण्यात नाही. तरी त्यांचे सर्वांशी वागणे बोलणे अगदी सहज भावे, बडेजाव, अवडंबर काहीही न ठेवता. सगळ्यांत मिसळतात. लहान मुलाशी लहान मुलासारखे, तरुणांशी तरुणांसारखे, वृद्धांशी वृद्धासारखे. कोणत्याही गरीबाशी ते तितक्याच आपुलकीने, सहजतेने वागतात जितके एखाद्या श्रीमंताशी. त्यांचा समभाव कायम तसाच असतो सर्वांसाठी. स्वामीजींच्या मार्गदर्शनाप्रमाणे चालणाऱ्यांचे जीवन सार्थक झाल्याचे मी पाहतो आहे. पुन्हा एकदा मी माझ्या शब्दात सांगतो या कलीयुगात, सांप्रत काळात स्वामीजींसारखे संत मिळणे दुर्लभ आहे आणि मी स्वतःला भाग्यवान समजतो की त्यांची छात्रछाया मला लाभली आहे.

माझ्या जीवनातील प्रत्येक प्रश्नावर स्वामीजींनी मला मार्गदर्शन केले आहे. त्यांच्याशी माझा परीचय अनेक वर्षापूर्वी झाला. त्यांना माझी कर्मकांड करायची पध्दत आवडली आणि मला त्यांचा आश्रय मिळाला. माझ्या दुर्दैवाने मी लहानपणीच आईची छत्रछाया गमावली आणि परिस्थितीमुळे मग मी शाळेत जाऊन शालेय शिक्षण न घेता भरुचला जाऊन संस्कृत व कर्मकांडाचे अध्ययन केले ते ज्ञान माझ्या क्षमतेप्रमाणे मिळवले. लहानपणीच गाव आणि घर सोडल्याने मला माझ्याच गावात (मांडवी, जि. सुरत) कोणी ओळखेना. मी उत्तमप्रकारे धार्मिक विधी करु शकतो हे कोणाला माहीतही नव्हते आणि सांगीतले तर खरेही वाटत नव्हते. त्यामुळे मी माझे शिक्षण घेऊन मांडवीला परतलो तरी मला कर्मकांडासाठी, धार्मिक कार्यासाठी कोणीही बोलवेना. अशा परिस्थितीत माझ्या चांगल्या ओळखीच्या आणि बहिणीकडून दूरच्या नात्यातल्या व्यक्तीकडे मी काही धार्मिक विधीसाठी गेलो असता त्या कार्यक्रमाला स्वामीजी उपस्थित होते. खरे तर हे माझे भाग्यच

म्हणायला पाहिजे कारण तेव्हापासून माझा भाग्योदय सुरु झाला. धार्मिक विधी आटोपल्यावर स्वामीजींनी प्रेमाने मला जवळ बोलावले, विचारपूस केली, काही प्रश्न विचारले. माझ्या उत्तरांनी त्यांचे समाधान झाले आणि त्यानंतर आश्रमाशी संबंधीत अनेक लोकांकडून मला धार्मिक विधीसाठी स्वामीजींच्या शिफारसीवरुन बोलावणे येऊ लागले. स्वाभाविकच त्या कार्यक्रमाला त्या यजमानांचे नातेवाईक व ओळखीचे इष्ट मित्र उपस्थित राहणारच. त्या लोकांनापण माझे काम आवडू लागले आणि आज स्वामीजींच्या कृपेने मांडवीच नव्हे तर आसपासच्या पंचक्रोशीत माझे चांगले नाव झाले आहे. इतकेच नव्हे तर जवळची मोठी शहरे बारडोली, सूरत, व्यारा येथून प्रसंगोपात तिथल्या स्थानिक ब्राह्मणांकडून पण मला मदतीसाठी बोलावणे येते.

विषय निघालाच आहे तर माझ्या व्यक्तिगत जीवनाचे दोन अनुभव येथे सांगतो. मी मांडवीत स्थिरावल्यावर आता माझ्या वडीलांनी व बहिणींनी माझ्या लग्नाचा विचार सुरु केला. पण माझ्या दुर्दैवाने माझ्या वडीलांचा अकाली स्वर्गवास झाल्याने आई नाही, वडील नाही असा मी अनाथ झालो त्यावेळी मला स्वामीजींचा खूप मोठा आधार मिळाला. त्यानंतर दोन तीन वर्षानी माझे लग्न ठरले. माझ्या मनात प्रश्न आला लग्नात वधूवरांना आशीर्वाद द्यायला घरात वडीलधारे माणूस कोणीच नाही आणि मला इतक्या सहवासाने माहित होते की स्वामीजी मुलाच्या वरातीत लग्नाला जात नाहीत. पण माझे अहोभाग्य की मी स्वामीजींना विनंती करताच ते माझ्या लग्नात आशीर्वाद द्यायला स्वखर्चाने उपस्थित राहीले. त्यानंतर दोन-तीन वर्षानंतरचा प्रसंग, मला मुलगा झाला. मुलाचे जावळ काढण्याचा दिवस जवळ आला पण बटुला आशीर्वाद कोण देणार? घरच्या परिस्थितीमुळे मी जावळ काढण्याचा कार्यक्रम घरी न ठेवता संतश्रेष्ठ श्रीरंगवधुतांच्या समाधीस्थानी नारेश्वरला (मोजक्या नातेवाईकांसह) करायचे ठरविले. स्वामीजी त्यावेळी महाराष्ट्र प्रवासात होते. मी त्यांना फोन केला. त्यांनी आश्वासन दिले की ते कार्यक्रमाला उपस्थित राहतील आणि झालेही तसेच. आपला बाकीचा प्रवास आटोपता घेऊन ते रेल्वेने परस्पर बडोद्याला गेले आणि तेथून लागलीच बसने नारेश्वरला पोहचले. एखाद्या गृहस्थाला पण लाजवेल असे स्वामीजींचे बारकाईने सगळ्या गोष्टींकडे लक्ष होते. मला आणि माझ्या बरोबरच्या नातेवाईकांना जे सुचले नव्हते ते ही स्वामीजींनी आठवणीने केले. मुंडन झालेल्या माझ्या मुलासाठी डोक्यावरची सुंदर टोपी आणली आणि नवे वस्त्र पण. सांगायचा उद्देश एवढाच की स्वामीजींच्या छत्रछायेत मी माझे आयुष्य आनंदाने जगत आहे. माझ्या समोर कोणत्याही अडचणी येवोत समस्या-प्रश्न-संकट येवोत स्वामीजी सदैव पाठीशी असल्याने मला कसलीच भिती किंवा चिंता वाटत नाही.

गुजरातमध्ये अनेक ठिकाणी अलीकडे एक विकृत पध्दत सुरु झाली आहे. वास्तुशांती असो, यज्ञोपवीत किंवा हवन असो तीन-चार तास चालणाऱ्या यासारख्या मोठ्या धार्मिक विधीत कर्मकांडी ब्राह्मण लोक ढोलके, झांज, पेटी वगैरे आणून पंचामृत पूजेच्या वेळी मूळ श्लोकांचे गुजराती भाषांतर संगीतमय पध्दतीने करतात. त्यांचे अनुकरण करण्याचा मी एकदा प्रयत्न केला तर स्वामीजी रागावले आणि म्हणाले, हा कार्यक्रम लोकांच्या मनोरंजनासाठी नाही. नियमाप्रमाणे व्यवस्थित श्लोक-स्तोत्र मंत्राचे शक्य तितके शुद्ध उच्चार करीत पारंपारीक पध्दतीनेच धार्मिक विधी, कर्मकांड करायचे. ज्यांना कार्यक्रमाला थांबायचे असेल ते थांबतील, ज्यांना जायचे असेल ते जातील. त्यांच्या मनोरंजनासाठी हे फालतू प्रयत्न करु नकोस. याच्या उलट यजमान आणि उपस्थितांना कोणता विधी कशासाठी केला जातो, त्याचा हेतू काय, त्यामागे पूर्वजांचा, ऋषींमूनींचा दृष्टीकोन काय होता, त्या विधीचे महत्त्व काय, उच्चारत असलेल्या स्तोत्रांचा, मंत्रांचा अर्थ काय ते समजून सांगण्याचा प्रयत्न करीत जा. स्वामीजींची आज्ञा मी मानली आणि आश्चर्य म्हणजे लोकांना ते खूप आवडू लागले आणि माझ्याकडून इतर ब्राह्मणांसारखी कोणीही अपेक्षा करीत नाही की, मी ढोलकी, पेटी,झांज घेऊन यावे. माझ्या दृष्टीने धर्माची रक्षा-परंपरेची रक्षा व धार्मिक विधी व कर्मकाण्डाची रक्षा यानेच होईल.

पूर्वी नारेश्वराचा उल्लेख आला आहे. कोण्या एका भक्ताकडे धार्मिक कार्यक्रम प्रसंगी संत श्रीरंगवधुत महाराज स्वतः उपस्थित होते. त्या आनंदात यजमानाने ब्राह्मणांसाठी अधिक दक्षिणा देण्याची इच्छा व्यक्त केली. श्रीरंगअवधुत महाराजांनी नकार दिला यथायोग्य जी दक्षिणा आहे तेवढीच द्या. जास्त देण्याने इतर मध्यमवर्गीयांना त्याचा त्रास होईल, हे लोक त्यांच्याकडूनही तेवढीच अपेक्षा करतील. चुकीची पध्दत पडेल. तुम्हाला जास्तीचे काही द्यायचे असेल ते नंतर व वेगळ्या पध्दतीने द्या दक्षिणा म्हणून नको. स्वामीजी पण हीच गोष्ट कटाक्षाने पाळतात. मांडवीजवळ पिप्पलवाड्याला माँ च्या विग्रहाची प्राणप्रतिष्ठा होती, त्यासाठी चाणोदहून (नर्मदाकिनारी) वेद विद्यालयाचे विद्वान ब्राह्मण येणार होते. त्यांचे मुख्य आचार्य रा. स्व. संघाशी पण संबंधीत आहे. कार्यक्रमाच्या सुचारु आयोजनासाठी पूर्वसूचना-पूर्वतयारीसाठी स्वामीजींनी त्यांना पंधरा दिवस आधी भेटून जायला सांगितले ते आले सर्व चर्चा झाली. त्यांनी आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन मंदिराच्या समितीला दिले. त्यानंतर स्वामीजींनी त्यांना विचारले, एकूण किती ब्राह्मण येणार? कार्यक्रम किती दिवस? ब्राह्मणांची जेवायची काय सोय करायची? दुपारी भोजनात काय हवे? रात्री काय हवे? भोजन फलाहार इतर आवश्यकता विचारुन घेतल्या आणि विचारले आचार्यांसह येणाऱ्या एकूण ब्राह्मणांची दक्षिणा किती द्यायची? आचार्य म्हणाले स्वामीजी मी रा. स्व. संघाचा जिल्हा प्रचारक आहे, सेवाभावी कार्यकर्ता आहे. तुम्ही या आदिवासी भागात एवढे सेवाकार्य हाती घेतले आहे आम्हीपण येथे सेवा करायला येणार दक्षिणा नको. स्वामीजी स्मितहास्य करीत म्हणाले, ब्राह्मणांना दक्षिणा दिल्याखेरीज कार्याचे यथायोग्य फळ या गृहस्थांना मिळणार नाही, शेवटी त्यांनी दक्षिणेचा आकडा सांगितला. स्वामीजींच्या पटकन लक्षात आले दक्षिणा फारच कमी सांगितली आहे. स्वामीजी म्हणाले हे बघा तुम्ही स्वतः रा. स्व. संघाचे कार्यकर्ते आहात हे खरे पण तुमच्याबरोबर येणारे दुसरे दहा ब्राह्मण त्यांचे काय? त्यांनाही घर संसार आहे. मुलामुलींच्या आईवडीलांच्या, पारिवारीक जबाबदाऱ्या असणार. इतक्या कमी दक्षिणेत त्यांचे कसे चालेल? लोकं जर एवढी कमी दक्षिणा देतील तर ब्राह्मण तरुण कर्मकांडाच्या क्षेत्रात शिकण्यासाठी व त्यावरच आजिविकेसाठी कसे येणार? त्यांना पुरेसे मिळायलाच पाहिजे. ठिक आहे, आता आम्ही आमच्या पध्दतीने जे योग्य ते करु. कार्यक्रम संपल्यावर स्वामीजींनी आचार्यांसह सर्व पुरोहितांना शाल-वस्त्र व योग्य ती दक्षिणा (त्यांनी सांगितली होती त्याच्या दुप्पट) दिली. सर्वांना आनंद झाला, प्रसन्नता वाटली.

स्वामीजी त्यांच्या प्रवचनात देखील सांगतात आपली सनातन संस्कृती टिकवायची असेल तर तिचाच एक भाग असलेले हे धार्मिक विधी, कर्मकांड याची पण चांगल्या रितीने जोपासना झाली पाहिजे. त्याकरीता ब्राह्मणाचे घर परिवार चालेल, तोही त्याच्यावरच्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडू शकेल आणि त्यालाही त्यांच्या मुलामुलींना शिकवायचे असते, त्यांचे लग्न करायचे असते. त्यांना जर समाजाकडून योग्य मानधन मिळाले नाही, त्यांचे आवश्यक तेवढे अर्थाजन झाले नाही, उपजीविकेसाठी संघर्ष करावा लागला तर त्यांनी हा व्यवसाय का स्वीकारावा? आपण हे सर्रास पहातो की, लग्नात फोटोग्राफी, विडीओग्राफीसाठी पन्नास हजार खर्च करणाऱ्या लोकांचा हात ब्राह्मणाची दक्षिणा देताना मात्र आखडतो. ते काटकसर करु इच्छीतात. त्यावेळी स्वामीजी तेथे उपस्थित असले तर यजमानाची चांगलीच कान उघडणी करतात. मी स्वामीजींच्या बाबतीत आणखी एक गोष्ट बघितली. कर्मकांड करताना ब्राह्मण पुरोहिताकडून काही चुकले तर स्वामीजी त्यावेळी काही बोलत नाहीत, मौन राहतात. नंतर मात्र कर्मकांड संपल्यावर त्या पूरोहीताला बोलावून प्रेमाने नीट समजून सांगत त्यांच्या चुका लक्षात आणून देतात. त्यावेळी ते ब्राह्मण म्हणतात, स्वामीजी या चुका पुन्हा आमच्याकडून होणार नाहीत याची आम्ही काळजी घेऊ. स्वामीजी इतरांसमोर चालू कार्यक्रमात चुका लक्षात आणून न देण्याचे दोन कारण आहेत एक कर्मकांड करणाऱ्या ब्राह्मणाला तो आपला पाणउतारा झाला, लोकांसमोर इभ्रत गेली, अपमान झाला असे वाटून ते पुढचे विधी उद्विग्न मनाने करु नयेत म्हणून व दूसरे कारण यजमानालाही हि

खंत वाटेल की आपण एवढा खर्च करुनही विधी व्यवस्थित झाला नाही म्हणून स्वामीजी दोघांच्या भावनांच्या रक्षणासाठी त्यावेळी मौन राहतात. स्वामीजी स्वतःसाठी पण कार्यक्रमाच्या यजमानांना अनावश्यक खर्च करु देत नाहीत. पिपरवाड्याच्या प्राणप्रतिष्ठेच्या कार्यक्रमात, जो स्वामीजींच्या आश्रमापासून सुमारे वीस कि.मी. दूर होता, तेथे येण्याजाण्याची व्यवस्था स्वामीजींनी स्वतःच केली. मंदिर समितीवर काहीही भार पडू दिला नाही. स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवसांचा कार्यक्रम खूपच उत्तम रितीने पार पडला. स्वामीजींनी मंदिरसमितीकडून काहीही स्वीकारले नाही. नंतरचा प्रसंग सगळ्यांचेच हृदय हेलावून गेला. गावातला प्रत्येक जण आपापल्या घरुन एकेक गुलाबाचे फूल घेऊन आला. त्या सर्वांनी स्वामीजींना वंदन करुन फूल अर्पण केले. या आदिवासी बांधवांच्या डोळ्यातले कृतज्ञतेचे अश्रू हीच स्वामीजींसाठी मोठी दक्षिणा, मोठा सन्मान होता.हा प्रसंग सर्व उपस्थितांचे हृदय हेलावून गेला.

स्वामीजीं अत्यंत शिस्तप्रिय आहेत, वेळेच्या बाबतीत अगदीच काटेकोर आहेत. मी अनेकदा पाहीले आहे की, कोणत्याही कार्यक्रमात आयोजकांना कधीच स्वामीजींची वाट पाहावी लागली नाही, स्वामीजी कार्यक्रमाच्या आधी निश्चितपणे कमीतकमी पाच मिनिटे पोहचणारच. एरव्ही माझ्याशी खूप प्रेमाने वागणारे स्वामीजी जर माझ्या बेपर्वाईमुळे मी कार्यक्रमास उशिरा पोहचलो तर ते मात्र स्वामीजी चालवून घेत नाहीत. माझी कान उघडणी करतात, वेळ पाळायला शिकवतात. स्वामीजींना भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची स्वामीजी प्रेमाने विचारपूस करतात, काही मदत हवी का म्हणून विचारतात. कोणी आजारी असल्याचे कळले की, स्वामीजी त्यांना भेटायला जातात. अगदी दवाखान्यात जाऊन पण विचारपूस करुन येतात. असे कोण संन्यासी आहेत की त्यांच्या संपर्कातील व्यक्तीसाठी दवाखान्यात पण जाऊन पोहचतील. स्वामीजी कोणाच्या घरी गेले तर त्या घरातील लहान मुलांशी रंगून जातात त्यांना कोडी विचारतील, विनोद सांगतील, मुले पण धीट होऊन स्वामीजींना म्हणतात, आता आम्ही तुम्हांला प्रश्न विचारतो. स्वामीजी म्हणतात विचारा, मुलांनी प्रश्न विचारल्यावर स्वामीजी काही क्षण विचारात पडल्याचे नाटक करुन मग मुलांना तोंड वाकडे करुन म्हणतात आम्ही हरलो बाबा नाही येत. मुले खुश होऊन उत्तर देतात. स्वामीजी त्यांचे कौतुक करतात. मुलांना आनंद वाटावा, त्यांचा हिरमोड होऊ नये म्हणून त्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर येत नसल्याचे सांगतात. स्वामीजी जो अभिनय करतात तो बघण्यासारखा असतो. तरुण मुलामुलींना सरळ काही उपदेश न करता मजेचे प्रश्न विचारतील, कोडी घालतील आणि त्यातूनच त्यांना सत्संग-योग्य उपदेश मार्गदर्शन करतील, यामुळे तरुण पिढी पण स्वामीजींना कंटाळून दूर पळत नाही, उलट अधिक जवळ येतात. हे सर्व प्रसंग स्वतः पहा, अनुभवा आनंद वाटेल तुम्हाला.

कोणीही स्वामीजींची काहीही सेवा केली असेल तर ती स्वामीजी कधीच विसरत नाहीत. यथायोग्य वेळी ते त्या ऋणातून मुक्त होण्यासाठी सदैव तत्पर व सावध असतात. त्यांची सेवा करणाऱ्यांना ते स्वतःच्या परिवारासारखे सांभाळतात. त्यांच्या सुखदुःखात स्वजनासारखे लक्ष देतात, गृहस्थपण असे करु शकणार नाही.

आश्रमापासून दूर बाहेरगांवी कोणाकडे काही दुःखद घटना घडली असेल, कोणी स्वर्गवासी झाला असेल वा अपघात झाला असेल किंवा इतर काही असो स्वामीजी स्वतःच स्वतःची येण्याजाण्याची व्यवस्था करुन घेऊन त्या व्यक्तीला, परिवाराला भेटून येतात. माझ्या पाहण्यात असे अन्य काणी गुरु, साधु-संन्यासी-महंत आले नाहीत. स्वामीजींना कोणी दिलेल्या वस्तूचा प्रेमाने स्विकार करतात व त्यांना त्याची आवश्यकता असेल तर स्वतःच नीट जपून वापरतात. सांगीतले तर आश्चर्य वाटेल तीस वर्षापूर्वी एका गावात स्वामीजींचा चातुर्मास झाला होता. चातुर्मास संपल्यावर स्वामीजी जायला निघाले त्यावेळी एका अत्यंत साधारण स्थितीतील अपंग माणसाने स्वामीजींच्या हातावर एक वस्तू ठेवली आणि म्हणाला स्वामीजी यापेक्षा मी तुम्हाला दुसरे काही देऊ शकत नाही. स्वामीजींनी त्याच्या खांद्यावर प्रेमाने हात ठेवला, हातातली वस्तू

बघितली तर ते नेलकटर होते. आता आश्चर्याची गोष्ट सांगतो गेली तीस वर्ष स्वामीजी तेच नेलकटर आजही वापरत आहेत आणि विशेष म्हणजे ते नेलकटर अजुनही जसेच्या तसेच आह. जसे कालच आणले असेल. भोजनाच्या वेळी, स्वयंपाकाच्या वेळी अन्नाची नासाडी स्वामीजींना आवडत नाही. एरवी शांत असणारे स्वामीजी यावेळी मात्र जमदग्नी होतात.

कोणतेही अवडंबर नसलेले साधे-सरळ, ज्ञानी असूनही अहंकाररहित. विनम्र, विनयी,साधनेने प्राप्त अनेक सिध्दीचा सहजतेने त्याग करुन निस्पृह असंग राहणाऱ्या स्वामीजींचे वर्णन शिवमहिन्म स्तोत्रामधील या श्लोकाने करावे लागेल 'असित गिरीसम....'. पुन्हा मी एवढेच सांगेन की, मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो, की अशा स्वामिजींची छत्रछाया मला लाभली याचा अभिमानच नाही तर गर्व देखील आहे. ज्यावेळी माझे ब्राह्मण मित्र मला म्हणतात, 'तुला कसली चिंता, बाबा तुझ्या पाठीशी तुझे स्वामीजी आहेत.' संस्कृत मधला प्रख्यात श्लोक **'त्वमेव माताच पिता त्वमेव ।'** हा माझ्या बाबतीत स्वामीजींच्या संदर्भात शत-प्रतिशत सत्य आहे.

स्वामीजी मेरी रोने की वजह कुछ भी हो ।

मेरे हसने की वजह सिर्फ आप हो ।

१६. 'तपः श्रीमंत' सवितानंद!

-दाजी पणशीकर

कोणत्याही महामार्गावर मोठमोठी झाडे किंवा वृक्ष हारीने लावलेले दिसतात. त्यामुळे त्या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाटसरुंना सावली मिळते. पण अशा मोठाल्या वृक्षांचे वाटसरुंना सावली देण्याचेच फक्त काम नसते या वृक्षांचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे आपल्या बहुसंख्य व जमिनीत खोलवर गेलेल्या मुळांनी रस्त्याखालील आजूबाजूची माती बांधून ठेवणे हे होय! अशा मोठमोठ्या जुनाट वृक्षांमुळेच महामार्ग सुरक्षित राहून कधी दुभंगत नाहीत. हे व असेच महत्त्वपूर्ण कार्य समाजातील काही विशिष्ट तपस्वी व निःस्वार्थ विचारवंत करीत असतात. त्यापैकीच एक ज्येष्ठ तपस्यामग्न व साधनामस्त पुरुषोत्तम म्हणजे स्वामी सवितानंद हे होत!

आयुष्यातील पहिल्या २०-२२ वर्षांच्या विद्याध्ययनाच्या काळात विद्यावंत होऊन वास्तविक कोणीही लगेच नोकरी किंवा व्यवसायात प्रविष्ट होत असतो, परंतु स्वतः उच्च प्रतीची विज्ञाना ची पदवी संपादन करूनही, नोकरीचे व पर्यायाने प्रापंचिक संसाराचे प्रलोभन नाकारुन, सलग ४५ वर्षे एकान्तवासी होऊन कठोर तपस्या करून आज ७५वे 'अमृत' वर्ष पूर्ण करणारे स्वामी सवितानंद हे आज कृतार्थ होत आहेत ! काही साधक समजू उमजू लागल्यापासूनच घर-संसार सोडून साधनेच्या कष्टप्रय व खडतर मार्गाने प्रवासाला लागून जनसामान्यांपासून खूप दूर दूर जाऊन ६०-७० वर्षांनंतर त्यातील काहीजण सिद्धावस्थेला पोचतात; परंतु असे खरेखुरे सिद्ध पुरुष किंवा थोर महात्मे आपली गिरिकंदरातील तीर्थस्थाने सोडून समाजात कधी येत नाहीत! त्यातील एखादाच अधिकारी पुरुष, समाजाच्या भाग्याने आपले तपस्येची 'पुण्य बँक' घेऊन *बुडते हे जन न पहावे डोळा* म्हणून कारुण्याने समाजात अवतरित होतो; व समाजाला निस्पृहपणे मार्गदर्शन करतो. अशा थोर मार्गदर्शकांपैकी एक म्हणजे आजचे उत्सवमूर्ती आदरणीय 'तप:श्रीमंत' सवितानंद हे होत!

वयाच्या २२ ते २४ वर्षाच्या कालावधीत स्वतः एम.एस.सी.ची पदवी संपादन करून, घरातील कुटुंब सदस्यांची एकमुखी संमती घेऊनच श्री सवितानंदानी, ऐन तारुण्यात(वय ३०) संन्यास घेतला! संन्यास कोणालाही, केव्हाही घेता येतो, पण तो संन्यास निर्लोभपणे व निःसंग होऊन टिकवणे हे भल्या भल्या संन्याशांना शक्य होत नाही! संन्यास घेतलेले बहुतांश संन्यासी हे 'संन्यास परीक्षेत' पूर्णपणे नापास होतात. आयुष्यभर अंगावरच्या भगव्या छाटीसह दिवस कंठीत असतात. ही वस्तुस्थितीच असते व आहेही! कारण अंगावर भगवी वस्त्रे चढवणे जितके सहज शक्य होते. तितके, काम-लोभ या चिवट शत्रूंना मनातून हद्दपार करणे अत्यंत कठीण व दुरापास्तच असते! म्हणून संन्यास घेणे व भगवी छाटी परिधान करण्याने काही साधत नाही. तो संन्यास न घेताही, जन्मापासून पाचवीला पूजलेले व सर्वांगाला अंतर्बाह्य, गोचीडासारखे चिकटलेले काम-क्रोध, लोभ-मोह, माद-मत्सर हे षडरिपू जिंकता येतात. संसारात राहून व प्रापंचिक होऊनही हे दुष्कर युद्ध जिंकता येते ! पावसचे स्वामी स्वरूपानंद किंवा गोंदवलेकर महाराज यांनी कुठे संन्यास घेतला होता? या षडरिपूंच्या विरोधात संन्यास घ्यावा लागतो! त्यासाठी निर्धार, निग्रह, निश्चय व निर्मोह अंगी असावा लागतो ! हे चार मित्र जर सोबतीला नसतील तर कोणी संन्यास घेतलाच तर तो संन्यासी चौफेर अयशस्वीच होतो असे माझे निरीक्षण आहे. श्री सवितानंदांचे खास वैशिष्ट्य हे आहे की, यानी संन्यास घेण्याआधीच अत्यंतिक निर्धाराने या त्रासदायक शत्रूना 'रोखून' धरलेले होते! त्यामुळे संन्यासाची दीक्षा हा त्यांच्यासाठी एक लौकिक असा फक्त

उपचार होता; ते आधीच मनातून संन्यासी होते. ते तसे जन्मतःच संन्यासी होते म्हणूनच ते पुढे सर्व आयुष्यात निःसंग व निर्मोही राहू शकले! अशा खऱ्या संन्यासाला, आपल्या निरासक्त आचरणाने प्रतिष्ठा देणाऱ्या स्वामी सवितानंद यांचा आपण आज अमृतमहोत्सव साजरा करीत आहोत! त्यांचा कृतज्ञमने सन्मान करीत आहोत!

स्वामी सवितानंद प्रथम गुजराथमधील जुनागढजवळच्या गिरनार पर्वतावर गेले. या गिरनारच्या सर्वोच्च अशा 'गुरु शिखरा'वर पोचण्यासाठी प्रथम दहा हजार पायऱ्या चढून जाव्या लागतात! तरुण सवितानंद या पायऱ्या झरझर चढून गेले असणार हे आपण गृहीत धरु ! पण लक्षात घ्या! ते पर्यटक म्हणून गेले नव्हते! त्यांना गुरु शिखरावरील दत्त पादुकांचे दर्शन घेऊन, संतुष्ट होऊन परतायचे नव्हते! त्यांना कमीत कमी वेळात पायऱ्या चढून जाण्याचा काही विक्रमही करायचा नव्हता! सवितानंदांना दत्तगुरुच्या पादुका दर्शनाबरोबर खऱ्याखुऱ्याच गुरुची आवश्यकता होती! त्याचा शोध घेण्यासाठी त्यांनी १० हजार पायऱ्या ओलांडून गुरुशिखर गाठले होते! गिरनारची प्रत्येका पायरी त्यांना गुरुशोधाचा' 'संदेश' देत होती! गिरनारची प्रत्येक पायरी त्यांना गुरुप्राप्ती किती कठीण असते, ते बजावून सांगत होती. सर्व पायऱ्या चढून गेल्यानंतरही 'गुरु' भेटतील याची खात्री नव्हतीच! कारण त्या गिरनारच्या पहिल्या पायरीपासूनच गुरुपदाचे भगवे मुखवटे धारण केलेले, पोटभरू असे असंख्य गुरु तेथे प्रत्येक यात्रेकरुला घेऊन दीक्षाविधी करण्याच्या प्रतीक्षेत होते ! त्यांच्या आमंत्रणांना धीराने नकार देतच सवितानंद अखेरपर्यंत निर्धाराने वरपर्यंत पोचले! गिरनारपर्वतावरील 'नकली' गुरुंना सवितानंदांनी ओळखले व त्यांच्या मोहजालात ते अडकले नाहीत, तेथेच खऱ्या अर्थाने, परमार्थाच्या शाळेतील दहावीची परीक्षा ते चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाले होते. त्या तरुण वयात दश दिशातून सर्वांगावर किंवा काया-वाचा-मनावर सतत- अविरत आक्रमण करून हैराण करणाऱ्या षडरिपूंना पराजित करूनच सवितानंदानी गिरनारच्या १० हजार पायऱ्या यशस्वीपणे ओलांडल्यावरच त्यांना खरेखुरे 'गुरु' भेटलेही!

ऐन तारुण्यात सवितानंदांनी घर-संसार कठोरपणे कशासाठी सोडला होता? खऱ्याखुऱ्या गुरुप्राप्ती साठी! त्यांना योग्य मार्गदर्शन करणारा, निरपेक्षपणे खऱ्या गुरुचा, संन्यासाची दीक्षा देणारा गुरु हवा होता! त्यांचे उद्दिष्ट केवळ भगवे कपडे व कमंडलू हाती घेणे एवढेच नव्हते! त्यांना अंतर्बाह्य, मना-तनातून भगवा झालेला निःसंग महात्मा गुरु 'सद्गुरु' म्हणून पाहिजे होता! तो नक्की कुठे मिळेल त्यांचा शोध घेत घेत स्वामीजी या गिरनारवर पाहोचले!

घर सोडल्यानंतर स्वामीजींनी सर्वप्रथम 'गिरनार'ची निवड करण्यातही मोठे, औचित्य होते. गिरनारची आकाशगामी प्रचंड उंची, याची डोळ्यात न साठवणारी विशालता व त्याच्या नुसत्या दर्शनानेही कोणाचेही मन व्यापक करणारी वास्तविकता स्वामीजींच्या मनःपटलावर पहिल्या पायरीवरच कोरली गेली, गिरनारच्या दर्शनाने भारलेल्या व त्याचा उत्तुंग आदर्श डोळ्यात व मनात साठवतच स्वामीजी भराभर १० हजार पायऱ्या चढून सर्वोच्च शिखरावर पोचले! स्वामी सवितानंद साधनेच्या क्षेत्रात आजही सर्वोच्च शिखरावर आहेत!

परमार्थ क्षेत्रातील अधिकारी गुरुकडून विधीपूर्वक संन्यासाची 'दीक्षा' घेणे हे सवितानंदांचे मुख्य व पहिले उदिष्ट होते. नंतर एकांतात राहून प्रदीर्घ काल गुरुपदिष्ट मार्गाने, कठोर निग्रहाने तपश्चर्या करणे, अशा तपश्चर्येच्या परिपक्वतेनंतर अंतिम साक्षात्कार होणे, असे त्यांचे आयुष्याचे तीन उद्देश होते! हेच त्यांचे जीवन ध्येय होते. या उद्देशपुर्तीच्या ध्येयानेच भारावलेल्या अवस्थेत स्वामीजींनी एक मोठा निर्णय घेतला. ती म्हणजे यापुढे कधीही पायात चपला-वहाणा किंवा बूट न घालण्याचा आणि आश्चर्य म्हणजे गेली पन्नास वर्षे स्वामीजींनी अनवाणी काट्या-कुट्यातून अखंड भारताची भ्रमंती करून, चप्पल बूट वापरणाऱ्या असंख्य साधकांना, जिज्ञासूंना, नागरिकांना, श्रोत्यांना व वाचकांना परमार्थाच्या खडतर मार्गावर कसे चालावे हे शिकविले! स्वामीजी संपूर्ण आयुष्यभर ***शहाणे करून सोडावे सकळ जना*** या समर्थ रामदासांच्या आदेशाचे तंतोतंत पालन करीत आहेत, म्हणून त्यांचा सारा शिष्य वर्ग, त्यांचे अनुयायी, त्यांचे वाचक आज

त्यांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार करीत आहेत !

परमार्थ करायचा म्हणजे 'साधना' करावी लागते. कोणी जय जाप्य करतो, कोणी होम-हवन करतो, कोणी पुरश्चरण करतो, तर कोणी मर्यादित दिवसांचे अनुष्ठान करतो; तर कोणी सात दिवसांचे पारायण करतो, परंतु यापैकी ज्याला अंतिम साक्षात्कार किंवा दर्शन म्हणतात, ते काही होत नाही, असा या क्षेत्रातील जाणत्यांचा अनुभवच आहे! कारण या सर्वांची साधन 'सापेक्ष' असते हे होय! जय-जाप्य करून करुन, प्रवचन ऐकून किंवा तीर्थयात्रा करून किंवा मोठा दानधर्म करुनही कोणाला कधी 'साक्षात्कार' किंवा 'आत्मदर्शन' झाल्याचा इतिहास नाही! साधनेचे अंतिम उद्दिष्ट 'आत्मसाक्षात्कार' हेच असले पाहिजे! परंतु बहुसंख्य पारमार्थिकांना त्याची काही माहितीच नसते. त्यांची सारी धडपड व कामना साधनेतून त्यांना काही तरी मिळाव हीच असते! अशा असंख्य अज्ञानी गरजूंना सवितानंदांनी आपल्या अनेक पुस्तकातून अचूक मार्गदर्शन केले आहे !

गुरु म्हणजे काय, त्याची कृपा कशी होते? साधना म्हणजे नक्की काय असते, साधना करताना साधकांकडून कोणत्या चुका कशा होतात, त्या किती होतात, मोह कसा होतो, तो टाळावा कसा? कोणत्या व्याधीसाठी कोणता उपाय कसा करावा, साधना, प्रार्थना, पारायण कसे करावे स्वामीजींनी याचे मार्गदर्शन आपल्या प्रत्येक पुस्तकात केले आहे. शिवाय आजही स्वामीजी नवनवीन विषयांवर पुस्तकें किंवा ग्रंथ लिहून ते सातत्याने अज्ञ लोकांना निरपेक्षपणे मार्गदर्शन करीत आहेत. गेल्या ५०-६० वर्षातील पारमार्थिक अनुभवाचे सारे पुण्यसंचित त्यांनी सर्व समाजासाठी खुले केले आहे! नवीन पुस्तका वर त्यांनी स्वतःचा कॉपीराईटही सोडलेला आहे ! यापेक्षा निरपेक्षपणा तो कोणता असू शकतो?

स्वामीजींचे आणखी एक वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे त्यांनी कुठे मठ-महंती केली नाही. कोणत्या मठाची किंवा आश्रमाची स्थापना नाही, आश्रमातील उच्चासनाची गादी नाही, गुरुपणाचे मिरवणे नाही, कोणाला दीक्षा देण्याचा समारंभ नाही, की कोणाला गंडाबंध शिष्य करण्याचा देखावा नाही ! परमार्थात जे जे घातक, अपायकारक, प्रगतीला मारक ते ते स्वामीजींनी अत्यंत कठोरपण टाळलेले आहे!

स्वामीजी अशी अंगावर चालून येणारी प्रलोभने नाकारण्यात खूप यशस्वी झालेले खरेखुरे कारुण्यपूर्ण असे समाजसुधारक व समाजाचे निर्लोभी हितचिंतक आहेत! म्हणून स्वामीजी अमृतमहोत्सवी सत्काराला पात्र आहेत!

हा सार्वजनिक सत्कार म्हणजे स्वामी सवितानंद या एका व्यक्तीचा सत्कार नसून त्यांनी जन्मभर अंकीत केलेल्या व आयुष्यभर जोपासलेल्या सद्‌गुणांचा हा सत्कार आहे ! सर्व हयातभर मला काही नको या त्यांच्या प्रतिज्ञापालनाचा हा गौरव आहे! सर्व तऱ्हेच्या आक्रमक प्रलोभनांना नाकारण्याच्या त्यांच्या सामर्थ्याचा हा सत्कार म्हणजे गौरव आहे! ते संपूर्ण जीवन दारेषणा, वित्तेषणा व लोकेषणा जिंकण्यात यशस्वी झाले त्या 'यशाचा' हा सन्मान आहे!

स्वामीजींनी कोणाकडूनही काही घेणे जरी नाकारले तरी त्यांनी 'देणे' मात्र जीवनभर चालूच ठेवले! स्वतःजवळ कोणत्याही वस्तूंचा संग्रह नसताना प्रत्येक गरजूला स्वतःचे विचारधन मात्र त्यांनी भरभरून व मुक्तहस्ताने वाटले! जन्मभर अनवाणी भ्रमंती, दुसऱ्या वर्गाचा रेल्वेचा नेहमीचा प्रवास करुनही ते आयुष्यभर सर्वांना विचार देत राहिले! स्वतःच्या आचाराने त्यांनी अनेकांना संकटमुक्त कसे व्हायचे ते शिकवले आणि आज ते निरंतर दातृत्वाने, आचारनिष्ठ तपस्येने, लोभस नम्रतेने, अखंड आनंदाने, तृप्त-संतृप्त, तुष्ट-पुष्ट-संतुष्ट व समाधानी आहेत. आज त्यांच्या चेहऱ्यावर तृप्तीचे तेज ओसंडत आहे! आज त्यांच्या तपस्वी अस्तित्वाला गंगेचे मांगल्य, यमुनेचे माधुर्य व सरस्वतीचे साफल्य लाभलेले आहे!!

अशा आमच्या या अधिकारी व हितचिंतक स्वामी सवितानंदांना यापुढे शतायुष्य लाभो ही माँ अंबेचरणी प्रार्थना करून मी माझे हे थोडेसे मनोगत पूर्ण करतो किम् अधिकम् !

१७. नक्षत्रांचे देणे

– एक ज्योतिष अभ्यासक

।। श्री।।

स्वामी श्री सवितानंदांच्या जीवनाचे ज्योतिषिय विवेचन
जन्मतारीख – ०३/०७/१९४६. वार – बुधवार वेळ – सकाळी ११.३०
आषाढ शुद्ध पंचमी, जन्मरास सिंह, नक्षत्र मघा सिध्दीयोग, बालव करण. लग्नरास कन्या

राशीस्वामी सुर्य– ग्रहांचा राजा कर्मस्थानामध्ये षडबलामध्ये सर्वोत्तम, प्रखर तेज देणारा आहे. कर्मस्थानातील सुर्य उच्चशिक्षण, कुशाग्रबुध्दी, सामाजिक उच्चस्थान व अधिकारप्राप्ती देणारा आहे. सविता म्हणजे सूर्य. त्यामुळे त्यांच्या गुरूंनी त्यांना सवितानंद हे नाव बहाल केले. परंतू मातृ सुखात कमतरता राहते. वयाच्या १९ व्या वर्षी घरामध्ये दु:खद घटना घडवितो. तसेच चंद्रराशी सिंह १२ व्या स्थानी असल्यामुळे मुळातच ही पत्रिका मोक्ष देणारी आहे. त्यामध्ये चंद्र मंगळ अंशांत्मक युती असल्याने हा अष्टलक्ष्मीयोग प्राप्त झालेला आहे.परंतु हा योग कुटुंबासाठी नसून आश्रम, हॉस्पिटल, शिक्षण संस्था व ट्रस्ट यासाठी फलदायी आहे.

लग्नराशी स्वामी बुध हा कर्मस्थानाचा अधिपति असून जन्मवाराचा स्वामी आहे. तो शनि, बुध, प्लूटो या मित्रांसोबत लाभस्थानी आहे. तो सर्व इच्छा पूर्ण करणारा आहे. तसेच सर्व स्तरातील मित्रांचा बहुमूल्य संग्रह देणारा आहे. लग्नस्थानातील बुध हा व्यक्तीला संपन्न, बुध्दी, सुखी, नोकरचाकर, दिर्घायु, सौम्यस्वभाव, विवेक , ज्ञानी, भाग्यवंत व लोकप्रिय करतो. त्यामुळे स्वामीजी हे बहू आयामी व्यक्तीमत्व संपन्न आहेत. त्यांना सर्वच क्षेत्रातील उत्तम जाण आहे. बुध हा लिखाण, प्रकाशन, कॉम्प्यूटर इत्यादी गोष्टीमध्ये सर्वोत्तम यश देतो.

